# प्रकरण पहिले

# पु.ल. देशपांडे यांचे व्यक्तिमत्व

# – प्रकरण पहिले –

## – पु.ल. देशपांडे यांचे व्यक्तिमत्व –

---

### पु.ल. म्हणजे एक वाङ्.मयीन चमत्कार :–

पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे! मराठी माणसाला वाटणारा गोड चमत्कार! अद्‌भूत, भीषण, रौद्र असले चमत्कार भारतात नेहमीच घडत आले आहेत. योगसिद्धी प्राप्त झालेल्या साधुसंतांनी अन् ऋषिमुनींनी पाण्यावर अथवा विस्तवावर चालून, वर्षानुवर्ष वायु भक्षण करून किंवा महिनेच्या महिने स्वतःला जमिनीत पुरून घेऊन सामान्य जनांना थक्क करून सोडले आहे. पण 'पु.ल. देशपांडे' हा चमत्कार या जातीचा नव्हे!

गीतेतील गहन तत्त्व सोप्यात सोपे करून दाखविण्याचा लोकमान्यांनी जो चमत्कार केला, मराठमोळया रसवंतीला सम्राज्ञीचे ऐश्वर्य बहाल करून राम गणेशांनी जी किमया करून दाखविली आणि स्वर्गीय स्वरमाधुर्याची प्रचीती आणून देऊन बालगंधर्वांनी ज्या नवलाईचा साक्षात्कार घडविला त्या जातीचे नवल पु.ल. देशपांडे यांच्या कर्तृत्वातून सिद्ध झाले.

प्रतिभासंपन्न लेखक, दर्दी गायक, कुशल नट, जाणकार दिग्दर्शक, मार्मिक नकलाकार, चतुर विडंबनकार, निष्णात हार्मोनियम वादक आणि प्रभावी वक्ता असे देशपांडयांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलु ज्यांनी ज्यांनी जवळून पाहिले आहेत त्या सर्वांना हे विधान सहज पटण्यासारखे आहे.

### बुहरंगी बहुढंगी व्यक्तिमत्व म्हणजे पु.ल. :–

अध्यापन, नभोवाणी, दूरचित्रवाणी यासारख्या क्षेत्रांशी त्यांचा थोडा बहुत संबंध आला होता तिथे देखील त्यांच्या असाधारण व्यक्तिमत्वाचा ठसा उमटल्यावाचून राहिला नाही. पु.ल. देशपांडे यांचे बहुरंगी आणि बहुढंगी व्यक्तिमत्व होते.

कोणत्या तरी एका गुणाच्या बाबतीत उत्कर्षाची परमसीमा गाठणारी अनेक माणसे महाराष्ट्राने पाहिली आहेत, पण अनेक गुणांचा समुच्चय घेऊन जन्माला आलेली पु.लं. सारखी व्यक्ति त्याला क्वचितच पाहायला मिळाली असेल.

आधुनिक वनस्पतीशास्त्रज्ञ एकाच रोपटयावर विविध रंगांची नि जातीची फुले उमलवून दाखविण्याची अजब करामत कधी कधी करतात नां? पु.लं.चे आयुष्य म्हणजे नियतीने करून पाहिलेला असाच एक आश्चर्यकारक प्रयोग आहे, अशी एक गमतीची कल्पना मनाला स्पर्शून जाते.

पु.लं.च्या ठिकाणी वास करणाऱ्या या गुणांपैकी त्यांनी प्रयत्नाने साध्य केलेले किती अन् निसर्गदत्त किती याचा विचार करू लागलो म्हणजे चट्कन् ध्यानात येते ते हे की, बऱ्याचशा गुणांची देणगी त्यांना उपजतच लाभली असली तरी त्यांच्या जोपासनेसाठी अन् विकासासाठी त्यांना कमी कष्ट घ्यावे लागले नाहीत. एखाद्या मेहनती शेतकऱ्याच्या निरलसपणाने अन् तत्परतेने त्यांनी आपल्या प्रत्येक गुणाचे जतन करून तो वाढीस लावला. लेखन असो, संगीत असो वा अभिनय असो जी जी कला बीज रूपाने स्वतःच्या ठिकाणी वास करीत असल्याची त्यांना जाणीव झाली तिच्या आविष्कारासाठी अन् अभिवृद्धीसाठी त्यांनी जिवापाड परिश्रम घेतले, अनेक खस्ता खाल्ल्या, कमालीच्या प्रतिकूल परिस्थितीला तोंड दिले.

जिवाभावाने उपास्य दैवताची भक्ति करणाऱ्या एखाद्या भाविकाप्रमाणे पु.ल. देशपांडयांनी आपल्या कलात्म वृत्तीवर प्रेम केले. त्यांची ही निष्ठा जितकी कौतुकास्पद वाटते तितकाच माणुसकीबद्दल वाटणारा जिव्हाळाही आदरणीय वाटतो. कला-मुल्यांइतकीच त्यांची माणुसकीच्या मुल्यांवर अपार श्रद्धा आहे, पराकोटीचा विश्वास आहे. म्हणूनच तंबोरा छेडीत बसलेल्या हिराबाईंची कलात्मता त्यांना जितकी प्रिय वाटते, तितकीच हातात केरसुणी घेऊन घर झाडीत असताना दिसून येणारी त्यांची संसार दक्षताही त्यांना विलोभनीय वाटते. त्या स्वरसम्राज्ञीच्या संगीत साधनेने त्यांच्यातला कलावंत जसा दिपून जातो तसा नातवांची दुपटी धुणाऱ्या त्या गायिकेची वत्सलता पाहून त्यांच्यांतला 'माणूस' हरवून जातो!

हिराबाई, बालगंधर्व, भीमसेन जोशी, कुमार गंधर्व ही तर जाणून बुजून कलावंत मंडळी पण कलेची उभ्या जन्मात ज्यांची कधी तोंडओळख झाली नाही अशा मंडळींच्या ठिकाणी त्यांना माणुसकीचा आढळ झाला की, त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करायला ते उत्सुक असतात. अंतू बर्वा, बबडू, सखाराम गटणे, चितळे मास्तर, बापू काणे या व्यक्ति याच वृत्तीतून साकार झाल्या. साहित्य संगीत न जाणणाऱ्यांना पशुकोटीत ढकलणारा सुभाषितकार आज मितीला हयात असता तर देशपांडयांनी हरितात्या, नारायण, अंतू बर्वा वगैरेंसारख्या मंडळींची लांबच्या लांब परेड उभी करून तिच्यापुढे त्या सुभाषितकाराला कान धरून शंभर उठाबशा काढायला भाग पाडले असते.

**कलावंत पण माणुसकी असणारा माणूस :–**

कले इतकीच माणुसकीचीही त्यांना कदर आहे, म्हणूनच त्यांच्या संबंध लेखनाला मग ते विनोदी स्वरूपाचे असो, व्यक्तिचित्रणपर असो, प्रवास वर्णनपर असो वा नाटयात्मक असो एक प्रकारची हिमालयाची उंची लाभू शकली. नुसती उंचीच नव्हे तर त्या नगाधिराजाची आर्द्रता नि शुचिताहि!

भूतांची दया हेच संतांचे भांडवल असते असे तुकाराम महाराज म्हणून गेले. संतांप्रमाणेच पु.ल. देशपांडयांच्या साहित्याचेही हेच मुख्य भांडवल आहे असे आजच्या घटकेला तुकोबा आपणात असते तर त्यांना वाटल्यावाचून राहिले नसते। अध्यात्मात काय किंवा साहित्यांत काय अनुभूतिवाचून

नुसती शब्दांची कसरत करणे म्हणजे तुकोबांच्याच भाषेत सांगायचे झाले तर पोटाला चिंध्या गुंडाळून गर्भारपणाचा आभास निर्माण करणाऱ्या वांझेची ती निव्वळ 'चावटी' आहे! 'तुका म्हणे भावेवीण। अवघा बोलती तो शीण।' असे या संदर्भात त्यांनी म्हणून ठेवले आहे. जीवनानुभूति वाचून शब्दांचा फापटपसारा मांडणारे खंडोगणति कवी–लेखक आजमितीला दिसत आहेत. जीवनाचा खूप खूप अनुभव घेऊन, ते नीट पचवून लेखणी हातात घेणारा पु.ल. सारखा एखादाच साहित्यिक दृष्टिपथात येतो.

काही लेखकांच्या साहित्याला उंची असते पण ते स्वतः त्या मानाने फार खुजे असतात. रंगपटात जाऊन तोंडाचा रंग पुसून टाकल्यावर नाटकी हरिश्चंद्राचा अन् औदार्य, सत्यवचन, गुरूभक्ती इत्यादी शब्दांचा सुतराम संबंध उरत नाही, तसे लेखनकर्म आटोपून लेखणी खाली ठेवली की, या लेखकाचे अन् त्यांनी आपल्या वाड्.मयातून पुरस्कारिलेल्या तत्त्वाचे काडीइतकेही नाते शिल्लक राहत नाही! साहित्यिक म्हणून पु.लं.चा आगळेपणा चित्तावर ठसतो तो हा की, त्यांच्या साहित्यात ज्या रसिकतेचा, उदात्ततेचा नि मानवाविषयीच्या जिव्हाळयाचा आपल्याला प्रत्यय येतो ते सारे त्यांच्या जीवनात पूर्णपणे मुरले आहे. म्हणूनच त्यांचे वाड्.मय निर्जीव वाटत नाही, नकली वाटत नाही.

**बहुविध नमुन्यांचे रसायन पु.लं.च्या लेखनात :–**

तसे पाहिले तर पु.लं.चे पाऊल जेमतेम पन्नाशीच्या उंबरठयावर पडले असेल नसेल, पण एवढया वयातही त्यांनी जगाचे इतके निरीक्षण केले. भल्याबुऱ्या माणसांचे इतके नमुने पाहिले, बऱ्या वाईट अनुभवांचा एवढा अफाट संग्रह जवळ बाळगला की, त्यातून निष्पन्न झालेले त्यांचे वाड्.मय वाचीत असताना जिवंत अनुभूतींनी रसरसलेला जीवनगाथा अवलोकीत असल्याप्रमाणे राहून राहून वाटू लागते. दहाव्या अकराव्या वर्षी वेदांताच्या गोष्टी करणाऱ्या सनकाडीसारख्या चिमुरडया मुक्ताबाईबद्दल नामदेवांना अचंबा वाटला होता. पन्नाशी ओलांडण्यापूर्वी समग्र जीवन कवेत घेऊ पाहणाऱ्या पु.लं.च्या प्रतिमेचा आवाका पाहून साहित्य सृष्टीतले भलेभले वागीश्वरही असेच चकित झाले असतील!

जगाच्या शाळेत देशपांडयांच्या लेखन तपस्येला खरी सुरूवात झाली असली तरी शाळेच्या

जगात तिची पूर्वतयारी होत होती हे नाकारता येणार नाही. घरी वडील, आजोबा, आई यांच्या छत्रछायेखाली आणि बाहेर पेंढारकर, भागवत, जे.व्ही. जोशी, तारकुंडे यांच्यासारख्या निष्ठावंत गुरूजनांच्या सहवासात पु.लं.ची अभिजात प्रतिभा पोसली जात होती. त्यांच्या रसिकतेचे नि सद्‌भिरूचीचे संगोपन होत होते. पेशा कारकुनाचा पण वृत्ति महाकवीची असलेले फणसळकर मास्तरांसारखे आदर्श समाजसेवक नव्या पिढीच्या अभ्युत्थानाचे भव्य स्वप्न मनःपटलावर रंगवीत होते. देशपांडयांचे रामायण घडविण्यात या द्रष्टया महाकवीचा फार मोठा वाटा होता हे आपणाला विसरता येणार नाही.

फणसळकर मास्तरांची ती सबंध पिढीच स्वतःसमोर भव्य आदर्श ठेवून त्याप्रमाणे वागू पाहणाऱ्या प्रयत्नवाद्यांची होती. दादासाहेब पारधी, चांदीवाले परांजपे, ऋग्वेदी उर्फ वामन मंगेश दुभाषी या कर्त्या पुरूषांचा प्रत्येक शब्द झेलण्यात गावाला धन्यता वाटावी असा तो जमाना होता. त्या वेळच्या पार्ल्यातल्या वातावरणाचे पु.लं.नी मोठे सुरस वर्णन केले आहे त्यातला काही भाग असा :(1)

"....पार्ले हे एके काळचे छोटे कुटुंब होते. जोशांच्या बब्याची मुंज झाली तर नामा सुतारापासून खुशाल शेठजींपर्यंत सगळयांना घरचे कार्य उभे राहिल्याचा आनंद होता. गावात खाणावळ चांगली चालू शकत नव्हती. कोणीही कोणत्याही घरी जावे ते घर त्याला परके नव्हते. आता सारी माणूसकीला पारख्या झालेल्या काळात नांदणारी माणसे तिथे एकमेकाला परकी झाली आहेत. त्यावेळी प्रत्येकाची कुठे तरी श्रद्धा होती. कशाला तरी आपल्या निष्ठा जोडलेल्या होत्या. छोटेसे टिळक मंदिर, रात्री चर्च सारखी घंटा वाजली की, मंडळी व्याख्यान पुराणाला घरात जमल्यासारखी अगत्याने जमत... पहाटे आखाडा गजबजलेला. नमस्काराचार्य सोमणांचा चातुर्मासांतील लक्ष नमस्कारांचा संकल्प पुरा करण्याची जबाबदारी घरांतल्या कुळाचाराची सांगता करण्याच्या जबाबदारी इतकीच साऱ्या पार्ल्याची...

"कर्त्या पुरूषाच्या शब्दावर पार्ल्याने चालावे. त्यांना रूचेल ते पार्ल्याने बोलावे. गावांतल्या कुठल्याही चुकणाऱ्या मुलाचा कान ह्या वडीलधाऱ्या मंडळींनी आजोबाच्या अधिकाराने उपटावा. कुठल्याही मुलाच्या पाठीवर कौतुकाचा हात फिरवायला ह्या मंडळींनी पुढे यावे. आपल्या बऱ्या वाईट

कृत्याने पार्ल्याला खाली पहावे लागेल ही भावना लहानपणापासून आमच्या मनात रूजलेली। ह्या साऱ्या आजोबांच्या देखरेखीखाली गावांतले शे दीडशे नातू वाढत होते. चांदीवाले परांजपे श्रीमंत. त्यांनी टिळक विद्यालयाच्या आर्थिक जबाबदारीचा बोजा आपल्या शिरावर घेतलेला. दादासाहेब पारधी कणखर लष्करी खाक्याचे. खांदे वाकवून पार्ल्यातला मुलगा अगर मुलगी चालली की, दादांचा दणका बसलाच त्याच्या पाठीत. त्यांच्या बागेतल्या अंगणांत साऱ्या गावांतल्या पोरांचे क्रीडांगण होते... कुस्तीला वाळू टाकलेली, पन्नास माणसांनी एकदम मजेत पोहावे एवढी प्रचंड तलावासारखी विहीर खोदलेली आणि आमचे अण्णा -- त्यांनी साऱ्या मुला--मुलींच्यावर सुंदर संस्कार करण्याची जबाबदारी घेतलेली. कुठे प्रवचन कर, कुठे फणसळकर मास्तरांना घेऊन गीतावर्ग चालव, पांडवप्रताप हरिविजयातल्या कथा शे सव्वाशे मुलांना सांगत बस असले उद्योग चालवायचे। समर्थ, छत्रपती आणि लोकमान्य ही त्रयी हे साऱ्या गावाचे अधिष्ठान।...गरीब कारकुनी पेशाची सारी मंडळी डोळयापुढे हिमालया सारखे आदर्श ठेवनू वाट चालण्याचा प्रयत्न करीत होती...."

अशा प्रयत्नवादी, ध्येयनिष्ठ, संस्कार संपन्न, वडीलधाऱ्या पुरूषांचे बोट धरून पु.लं.नी पहिलीवहिली पावलं टाकली.

**माता पित्यांचे संस्कार :-**

चार भिंतींच्या मर्यादेत पु.लं.च्या सुप्त गुणांच्या विकासाला हातभार लावला तो त्यांच्या आई वडिलांनी अन् आजोळच्या आजोबा--आजींनी. आई वडिलांनी त्यांची नाटय नि संगीत विषयक अभिरूची जोपासली. आजींकडून विनोदबुद्धीचे देणे मिळाले नि आजोबांनी काव्यात्मतेचे संस्कार केले. ऋग्वेदी विद्वान खरे, पण पु.लं.नी म्हटल्याप्रमाणे त्यांचा संगीताशी मतभेद होता. त्यामुळे वडीलकीच्या नात्याने पु.लं.चा कान पिळण्यापलीकडे अगर एखादे दुसऱ्या वेळी त्यांची कानउघाडणी करण्यापलीकडे त्यांनी नातवाच्या कानाला फारसे महत्व दिले नाही. पुरूषोत्तम गायला बसला म्हणजे 'करीन यदुमनी सदना' हा चरण ज्याअर्थी तीन तीनदा घोळवतो त्या अर्थी त्याला ते पद संपूर्णपणे पाठ येत नसले पाहिजे असा भाबडा गैरसमज करून घेण्याइतपत त्यांचे संगीताशी सूत होते. पण लक्ष्मणराव पु.लं.चे वडील संगीताचे जाणकार होते. चिरंजिवाला स्वरांचा लळा आहे हे त्यांनी तेव्हाच ओळखले. गाण्याची बैठक असो किंवा बालगंधर्वांचे नाटक असो ते पुरूषोत्तमला बरोबर

घेतल्याशिवाय कधीही एकटे गेले नाहीत.

पु.लं.च्या मातोश्रींनीही त्यांचा संगीताचा छंद जोपासला. बालपण फक्त गळा काढण्यासाठी असते असे मानणाऱ्या माऊलींपैकी त्या नव्हत्या! देवाची गाणी, अभंग, श्लोक, दिंडया, साक्या इत्यादि रचना पुरूषोत्तमच्या तोंडून ऐकताना त्यात गोडवा नि सुरेलपणा असल्याची त्यांची खात्री होऊ लागली आणि मुलातल्या गाण्याच्या अंगाने बाळसे धरावे म्हणून त्या परोपरीने प्रयत्न करू लागल्या.

शालेय जगात पाऊल टाकल्यावर पु.लं.च्या गायनी कलेला अधिक समज येऊ लागली. शालेय समारंभ, स्नेहसंमेलन, गणपती उत्सव इत्यादी प्रसंगी ते धिटाईने पदं म्हणून दाखवू लागले. गायना बरोबरच अभिनयाचीही त्यांना उपजत देणगी मिळाली असल्याचे त्यांच्या अध्यापक वर्गाच्या ध्यानात येऊन चुकले. उत्सव, संमेलनाच्या वेळी होणाऱ्या नाटकात ते त्यांच्याकडे लहान मोठया भूमिका सोपवू लागले.

जोगेश्वरीच्या प्राथमिक शाळेतून ते पार्ल्याच्या माध्यमिक शाळेत आले तेव्हा त्यांच्या ठिकाणच्या आणखी दोन कलांचा तिथल्या शिक्षकांना परिचय घडून आला. त्या म्हणजे नकला आणि वक्तृत्व. थोडयाशा तयारीनंतर किंवा आयत्या वेळीही दिलेल्या विषयावर पु.ल. अस्खलितपणे भाषण करून श्रोत्यांना चकित करून सोडीत. तसेच एखाद्या गायकाच्या गायकीचे बारकावे हुबेहुब कंठातून काढून दाखवून किंवा परिचित व्यक्तीच्या बोलण्या--चालण्याची सहीसही नक्कल करून ते उपस्थितांना प्रशंसोद्‌गार काढायला लावीत.

पु.लं.ची संगीत विषयक आवड वाढीस लागावी अशी आणखी एक गोष्ट त्यावेळी अस्तित्वात होती. ती म्हणजे गणेशोत्सव. त्या वेळचा गणेशोत्सव म्हणजे मूर्तिमंत ज्ञानसत्रच. या ज्ञानसत्राच्या जोडीला सुरांची सदावर्तही सर्वांसाठी खुली असत. स्वरांची तहानभूक लागलेल्या कुणाही याचकाने या सदावर्तात यावे अन् तृप्त होऊन कलावंतांना आणि उत्सवाच्या चालकांना दुवा देऊन परत जावे असा कारभार होता. 'फक्त निमंत्रितांसाठी' या हिशोबी आतिथ्याचा जन्म अलीकडला! गणपती उत्सवावर नाईट क्लबची पडत चाललेली सावलीही अलीकडचीच! अथर्वशीर्षानंतर रेकॉर्ड डान्स अन् पोवाडया पाठोपाठ केशभूषा स्पर्धा ही सांस्कृतिक भेळ तीस--बत्तीस वर्षांपूर्वी नावालाही

अस्तित्वात नव्हती। पु.ल. नी जो गणपती उत्सव पाहिला तो आता इतिहासजमा झाला आहे. त्या उत्सवाच्या वेळी त्यांनी जे मोठेमोठे गायक पाहिले, ऐकले त्यांच्या विषयीच्या स्मृति त्यांनी शब्दांकित करून मल्लिकार्जुन मन्सूर, कागलकर बुवा, मास्तर कृष्णराव, सवाई गंधर्व, गंगूबाई हनगल, गांधारी हनगल अशा नामांकित कलावंतांच्या स्वरसाधनेचा पहिला वहिला प्रत्यय पु.लं. ना आला तो या निमित्तानेच.

कॉलेजच्या वातावरणात पु.लं.च्या कलासक्तीने चांगलेच मूळ धरले होते. संगीत, अभिनय, नकला नि वक्तृत्व यांच्या विकासाला तिथे खूपच वाव मिळाला. जोगेश्वरीच्या इस्माईल युसूफ कॉलेजात पहिली दोन वर्षे आणि सरकारी लॉ कॉलेजात त्यानंतरची दोन वर्षे अभ्यास करून ते उत्तम तऱ्हेने साऱ्या परीक्षा उत्तीर्ण झाले खरे, पण त्या चार वर्षांच्या कालावधीत खरे सांगायचे तर 'रेकॉर्ड ऑफ राईट' पेक्षा हिराबाईच्या रेकॉर्डस्मध्ये अन् वादी--प्रतिवादी पेक्षा वादी–संवादी मध्येच त्यांचा जीव अधिक गुंतला होता. केस जिंकण्यापेक्षा मैफल जिंकण्याची स्वप्ने त्यांना अधिक भुरळ घालीत होती. कोणते कलम कुठे लावायचे यापेक्षा कोणता स्वर कसा लावायचा याकडेच त्यांचे सारे लक्ष लागले होते. त्यामुळे कॉलेजबाहेर पडल्यावर आशिलाऐवजी रसिकांनीच त्यांना गराडा घातला. गाणे, नकला नि अभिनय या गुणांवर बेहद्द खुश झालेल्या त्यांच्या मित्रमंडळींनी त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली खरी, पण पोटाला त्याचे काय कौतुक! पोटासाठी कोर्टाची नाही तरी दुसऱ्या कोणत्या तरी कचेरीची पायरी चढणे पु.लं.ना भाग होते. कलावंतांच्या काखेतला तंबोऱ्याचा भोपळा संसाराचा डोह तरून जायला फारसा उपयोगी पडू शकत नाही हे कळण्या इतपत प्रपंच विज्ञान दासबोधाची पारायणे करण्याआधीच त्यांना स्फुरले होते. वकिलीपेक्षा, कारकुनीपेशा त्यांना अधिक सोयीस्कर वाटून ते फायलींचे ढिगारे उपसू लागले! पण तिथे त्यांचे लक्ष लागेना. स्वर्गातले कोशागार सांभाळणाऱ्या कुबेराला उडपी हॉटेलच्या गल्ल्यावर बसवावे तसाच काहीसा हा प्रकार होता. कलेक्टर कचेरी, मोटर वेईकल्स कचेरी, इन्कमटॅक्स कचेरी असा एकामागून एक थारेपालट त्यांनी करून पाहिला. पण खोताच्या वाडीतील बिऱ्हाड धसवाडीत नेऊन मांडले तरी तिथल्या कुबट हवेत थोडाच फरक पडणार आहे?

रसिके अक्षरे मिळविण्यासाठी जन्माला आलेल्या पु.लं.ना ऑफिसातल्या आकडयांची

तोंडमिळवणी करता करता घाम फुटू लागला, सिनिऑरिटी, इफिशियन्सी बार, टी.ए., मेमो या शब्दांनी त्यांचे कान किटून गेले. षड्ज, गांधार, कोमल निषाद, अस्ताई यांपैकी एकही शब्द कानावर येण्याचे चिन्ह त्यांना तिथे दिसेना. खांडेकरांच्या लघुकथेपेक्षा अय्यंगाराने अमक्या तमक्याचा काटा काढण्याच्या गोष्टीतच अधिक रस घेणारी मंडळी अवतीभवती वावरत आहेत असे त्यांना दिसून आले.

पु.लं.च्याच भाषेत सांगायचे झाले तर तिथल्या वातावरणाशी त्यांच्या मनोधर्माची वेव्हलेंग्थ जमण्याचे लक्षण त्यांना दिसून येईना. आणि अशाच विषण्णतेत त्यांनी एके दिवशी मुंबईला राम राम ठोकून पुणे गाठले. डळमळलेल्या जीवनाला तिथे सावरता येईल असा त्यांना विश्वास वाटू लागला. मराठी घेऊन बी.ए. होण्याच्या इच्छेने त्यांनी फर्ग्युसन कॉलेजात नाव घातले. योगक्षेमा साठी शिकवण्या धराव्या लागल्या, खूप कष्ट उपसावे लागले. पण या साऱ्याचे चीज झाले बी.ए. ची पदवी पदरात पडली आणि त्याहीपेक्षा स्थलांतर सार्थकी लागल्याचा त्यांचा विश्वास दुणावला तो अनेक समानशीलां बरोबर मैत्रीचे नाते जुळल्याचे ध्यानात आल्यावर! चिंतामणराव कोल्हटकरांचा परिचयहि याच वेळी घडून आला.

पुण्याच्या हवेत प्लेगचे जंतु फार झपाटयाने पसतात हा त्या शहराचा दुर्लौकिक रँड साहेबांच्या कारकीर्दीबरोबरच इतिहासजमा झाला. उलट गुणी माणसाच्या गुणाचा दरवळ सर्वत्र चटकन् पसरावा असा तिथल्या हवेत आता सुसंस्कृतपणा आला आहे! पु.लं.च्या गायनाचे, नकलांचे, नाटयाभिनयाचे अन् वक्तृत्वाचे कौतुक करणाऱ्यांची त्यांच्या भोवती गर्दी होऊ लागली. चिंतामणराव कोल्टकरांसारख्या नाटयमहर्षींनी त्यांच्या अभिनय नैपुण्यावर लुब्ध होऊन त्यांना आपल्या ललितकलाकुंज या नाटयसंस्थेत आग्रहाने बोलावून घेतले. चिंतामणरावांचे हे आमंत्रण पु.लं.च्या नाटयतपस्येच्या साफल्याची ग्वाही देणारे प्रसादचिन्ह म्हटले पाहिजे अशा आशयाचा प्रा. मं.वि. राजाध्यक्ष यांनी या संदर्भात काढलेले उद्‌गार सार्थ आहेत.

याचवेळी स्वतःच्या आणखी एका शक्तीचा शोध पु.लं.ना लागला. आपल्या लेखणीला आकडे मानवत नसले तरी अक्षरांच्या सहवासाचा तिला सोस आहे हे त्यांना उमगून आले. टोपण नावाचा बुरखा घेऊन 'अभिरूची' मासिकातून प्रथमच वाचकांसमोर येताना 'लाजते, पुढे सरते, फिरते'

अशी काहीशी त्यांच्या प्रतिमेची अवस्था झाली होती खरी. पण सरावाने तिच्यांतला आत्मविश्वास दुणावू लागला आणि टोपण नावाचा बुरखा टाकून देऊंन ती उजळ माथ्याने रसिकांच्या पुढयात येऊन बसू उठू लागली. 'पुरुषराज अळुर पांडे' या विक्षिप्त टोपण नावाने वाचकांच्या मनात जेवढे कुतूहल निर्माण केले तेवढेच- किंबहुना त्याहून अधिक त्या नावाखाली प्रसिद्ध होणाऱ्या लेखनातल्या आगळेपणाने उत्पन्न केले. व्यक्तिचित्रणातला खुसखुशीतपणा, विनोदी लेखांतला मार्मिक उपरोध, उपहास, एकांकिकांतील चटकदार संवाद या लेखन गुणांमुळे रसिक वाचक पु.लं.कडे अधिक **अधिक प्रमाणात आकर्षित होऊ लागले.**

वय वाढते तसे मुलाला खेळायला अंगण अपुरे पडत असते. तसे पु.लं.च्या प्रतिभा विलासाला 'अभिरूचि' मासिकाची मर्यादा थिटी पडू लागली. किर्लोस्कर, हंस, मौज अशा मातब्बर नियतकालिकांच्या प्रांगणात तिच्या क्रीडनाला भरपूर अवसर मिळाला. त्या क्रीडनाचा एकेक विशेष, एकेक उन्मेष अवलोकीत असताना अख्खी मराठी मने हरखून गेली. काहीतरी अननुभूत, काही तरी वेगळे गवसल्याचा आनंद मराठी माणसाच्या डोळयातून ओसंडू लागला.

आजपर्यंत कोल्हटकर, गडकरी, चि.वि. जोशी, अत्रे यांनी त्याला विनोदाची यथेच्छ मेजवानी दिली होती. पु.लं.च्या विनोदाला तीच लज्जत असल्याची त्याची खातरजमा होऊ लागली.

**साहित्य आणि नाटयात मग्न असलेली प्रतिभा :-**

साहित्य आणि नाटय अशा दोन्ही क्षेत्रात पु.लं.ची प्रतिभा प्रकर्षाने तळपू लागली. रंगभूमीच्या जगात त्यांनी प्रवेश केला तो नट म्हणून. नाटककार म्हणून नंतर ते जगापुढे आले. चिंतामणराव कोल्हटकरांच्या तालमीत चारपाच नाटकात भूमिका करण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्यामुळे व्यावसायिक रंगभूमीवर त्यांचे पाऊल स्थिरावण्यास चांगलीच मदत झाली. त्यानंतर त्यांनी हौशी नटांबरोबरही बऱ्याच नाटयप्रयोगात लहान--मोठया भूमिका केल्या. अंमलदारमधल्या सर्जेरावच्या भूमिकेनंतर 'नट' म्हणून नि 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाने 'नाटककार' म्हणून त्यांना मिळवून दिलेली कीर्ती कुणालाही हेवा वाटावा अशी देवदुर्लभ कोटीतली म्हटली पाहिजे. रांगणेकरांच्या 'वहिनी' नाटकातील त्यांची भूमिका विशेष गाजली ती त्यांच्या गाण्यामुळे! मध्यंतरी गद्य नाटिकांच्या जमान्यात लुप्त होत चाललेले नाटयसंगीत पु.लं. सारखे आणखी काही नट रंगभूमीवर चमकले तर

उर्जितावस्थेला येऊ शकेल असा संगीतलुब्धांना विश्वास वाटू लागला.

पु.लं.च्या चतुरस्त्र प्रतिभेची ख्याती अशी चहुकडे पसरल्यावर बोलपट निर्मात्यांना त्यांना आपल्या मायानगरीत बोलावून घेण्याचा मोह झाला नसता तरच नवल। पु.ल. चित्रपटसृष्टीत जेवढया उत्साहाने शिरले तेवढयाच उद्वेगाने ते तिथून बाहेर पडले। कचेऱ्यांतल्या प्रमाणे तिथेही त्यांची वेव्हलेंग्थ फारशी कुणाशी जमली नाही. ज्या कोणाशी जमली ते मात्र जन्मोजन्मीचा ऋणानुबंध असल्याप्रमाणे पु.लं.वर अपार स्नेहाचा वर्षाव करीत राहिले. ग.दि. माडगूळकर, राम गबाळे, सुधीर फडके ही मंडळी असा ऋणानुबंध जोडल्यापैकीच।

हे सर्व खरे असले तरी पु.लं.च्या प्रकृतीला रूपेरी दुनिया मानवली नाही यात मुळीच शंका नाही. खरं पाहता त्यांच्या कल्पकतेला अभिनय गुणाला अन् संगीतातल्या जाणकारीला त्याहि क्षेत्रात खूपच वाव होता. आणि तिथल्या सहा--सात वर्षांच्या कालावधीत याचे प्रत्यंतरही त्यांनी आणून दिले होते. दिग्दर्शन, संगीत, पटकथा, संवादलेखन वगैरे अनेक आघाडया एकाच वेळी सांभाळून चित्रपटसृष्टीत कधी नव्हे तो विक्रम त्यांनी प्रस्थापित केला होता. 'सबकुछ पु.ल.' हे नवे बिरूद त्यांना सिनेशौकीनांनी बहाल केले ते त्यांच्या या अनन्य साधारण कर्तृत्वामुळेच.

असे असूनही ते तिथे रमले नाहीत. चित्रपट सृष्टीत पाऊल टाकताना चित्रपटाच्या प्रेक्षागृहांतच तेवढा काळोख असतो अशी त्यांची भाबडी श्रद्धा होती. पण प्रेक्षागारांतल्या अंधारापेक्षाही चित्रपट निर्मात्याची नि त्यांच्या साथीदारांची अंतःकरणे काळयाकुट्ट काजळीने माखलेली असतात असा त्यांना अनुभव आला आणि त्या मायावी सृष्टीत पुन्हा पाऊल न टाकण्याच्या निश्चयाने त्यांनी प्रस्थान ठेवले.

चंदेरी दुनियेचा निरोप घेताना त्यांच्या हृदयांत शेकडो कंटकशल्ये सलत असली तरी त्यांनी मागे शिल्लक ठेवली ती मखमालीची लवच। गुलाबाचा काटा स्वतःच्या उरांत खुपसून घेऊन त्यांतून ठिबकणाऱ्या रक्ताने गुलाब पुष्पाला टवटवी आणणाऱ्या बुलबुलाची गोष्ट ऑस्कर वाईल्डच्या का कुणाच्याशा कथासंग्रहात होती. मनींच्या व्यथा मनांतच ठेवून चित्रपटात प्राण ओतणाऱ्या, कथा, संवाद, संगीत, दिग्दर्शन या साऱ्यांत चैतन्य भरणाऱ्या पु.लं.ची निष्ठा या इराणी बुलबुलाच्या जातीची वाटते।

बोलपटातल्या गाण्यांना त्यांनी दिलेल्या एकाहून एक सुंदर चाली, 'मानाचे पान', 'पुढचे पाऊल', 'गुळाचा गणपती' वगैरे चित्रपटांतून घडविलेले अभिनयाचे सुरेख दर्शन, 'दूधभात', 'देवबाप्पा'इत्यादि चित्रपटांतून प्रत्ययास आणून दिलेली सोज्वळ भारतीय संस्कृति... ही मखमलीची लव मागे ठेवून या कलावंताने सिनेसृष्टीचा कायमचा निरोप घेतला.

गाणे, नकला, लेखन, दिग्दर्शन, नाटय असे आवडीचे छंद जोपासताना पु.लं.नी आणखी एका छंदाकडे लक्ष पुरविले – हार्मोनियम वादनाच्या! अगदी लहानपणापासून बाजाच्या पेटीबद्दल त्यांना विलक्षण आकर्षण वाटत आले होते. लक्ष्मणरावांनी ही मुलाची हौस भागविण्यात कसूर केली नाही. सुरेल स्वरांच्या बाजाच्या पेटीची खरेदी त्यांच्या बजेटमध्ये बसण्यासारखी नव्हती. पण तरीही त्यांनी मुलाला निराश केले नाही. नवव्या दहाव्या वर्षी आपल्या मुलाने बालगंधर्वांना उत्तमपैकी गत वाजवून दाखवून त्यांच्याकडून शाबासकी मिळवावी याचा त्यांना खूप आनंद झाला होता.

पार्ल्यातील दत्तोपंत राजोपाध्ये नावाच्या हार्मोनियम वादनपटू कडून पु.लं. नी पुढे शास्त्रोक्त धडे घेतले. नानाविध कामाचा व्याप पाठीमागे लावून घेतल्यामुळे त्यांच्या रियाजात मधून मधून खंड पडत गेला, पण तरीही मैफलीत एखाद्या गायकाच्या साथीला पु.ल. पेटी घेवून बसले म्हणजे आपल्या बोटातले कसब प्रकट करून श्रोत्यांची दाद घेऊन जातात. गोविंदराव टेंब्यांसारखे निष्णात वादनकार पु.लं.ची पेटी ऐकून निहायत खुश होऊन गेले,अशी त्यांच्या संबंधी एक आठवण सांगितली जाते. पु.लं.च्या वादन कौशल्याचा निर्वाळा द्यायला याहून आणखी कोणता सबळ पुरावा हवा? पु.लं.ना एखाद्या गवयाकडे चार--सहा वर्ष राहून रियाज करण्याची संधी लाभली असती तर? लेखणीच्या बळावर गगनाला गवसणी घालायला निघालेला हा कलावंत फक्त तंबोऱ्यालाच गवसणी घालीत बसला असता, त्यांच्या तंबोऱ्याने लेखणीला खाऊन टाकले असते.

कुणाचा तरी गंडा बांधायचा विचार पु.लं.ना सुचला नव्हता असे नाही. पण उपार्जनासाठी अनेक व्याप सांभाळावे लागल्यामुळे त्यांना तशी उसंत मिळणे शक्य नव्हते अन् आर्थिक दृष्टयाही ते परवडण्यासारखे नव्हते. मोठमोठया गायकांचे गाणे लक्षपूर्वक ऐकायचे, त्यांतले सूर कानात साठवायचे अन् घरी आल्यावर ते कंठातून काढण्याचा सराव करायचा, अशा पद्धतीने पु.लं.

ची संगीताराधना सुरू झाली. या साधनेतहि पु.लं.नी आपले वैशिष्टय कसे कायम राखले याचे प्रा. मं.वि. राजाध्यक्षांनी खुमासदार वर्णन केले आहे. ते म्हणतात(2)

"....ऐकलेले टिपले, पण टिपकागदासारखे नव्हे तर सारासार विचाराने. विविध सौंदर्याची वीण गुंफण्याच्या जिद्‌दीने आणि मुख्य म्हणजे अपार रसिकत्वाने. पुढे निरनिराळया बाजांचे संगीत शिष्यभावाने ग्रहण केले पण कोणत्याही घराण्याचा शिक्का बसण्याइतके नव्हे. साहित्याप्रमाणे संगीतांतहि देशपांडयांच्या प्रकृतीला शिक्केबाजी मानवत नाही आणि शिक्का उठवून घेण्याइतका पिंडही सपाट नाही!..."(ललित मासिक)

या बाबतीत स्वतः पु.लं.नी जे मनोगत प्रकट केले आहे तेहि असेच मार्मिक आहे. त्याचे म्हणणे असे –(3)

"सूर आणि लय ह्यांवर मी प्रेम केल्यामुळे कुठल्याही एकाच गायकाच्या किंवा गायिकेच्या मैफलीतला शराबी किवा नमाझी होऊन मी कधीच राहिलो नाही. मनाचे भिक्षापात्र मोकळे करून मी गाण्याच्या मैफलींना जातो, जे ते निर्मळ सुरांनी आकंठ भरून देतात त्यांना दुवा देत परततो. नाही भरले त्यांनी, आमचे भिक्षापात्र शाबूत ठेवले, हेहि नसे थोडके म्हणत परततो. सूरसंगतीत अधिव्याधीचा विसर पाडणारे कलाकार मला काल भेटले, आज भेटताहेत उद्याहि भेटतील. कलेच्या क्षेत्रात भरती ओहोटी असली तर बापडी; पण पूर्वी फक्त भरतीच होती आणि आता फक्त ओहोटीच आहे असे मला कधीच वाटले नाही." (गणगोत पृ. 79)

संगीतातली 'वतनदारी' जशी पु.लं.ना मान्य नाही तसा त्या क्षेत्रातला 'जातिभेद' ही त्यांना मंजूर नाही. कलेकडे अशा विशुद्ध दृष्टीने पाहणारे सच्चे कलावंत कितीसे आढळतील?

पु.लं.च्या दिग्दर्शन कौशल्याची साक्ष देऊन काही चित्रपटाचा निर्देश केला तसा त्यांचा संगीत विषयक जाणकारीचा अन् कल्पकतेचा निर्वाळा पटविणाऱ्या, त्यांनी बांधलेल्या काही चालींचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. माझीया माहेरा जा, हसले मनी चांदणे, नाच रे मोरा, इंद्रायणी काठी, ही कुणी छेडिली तार, कौसल्येचा राम वगैरे गीतांची त्यांनी इतकी श्रुतिमनोहर स्वर रचना केली आहे की अद्यापही ती रसिकांना गुण–गुणावीशी वाटतात.

कलेच्या दुनियेत पु.ल. स्थिरावत चालले तरी व्यवहाराच्या भूमीवर अद्याप त्यांचे पाय

घट्ट रोवले जात नव्हते. सरकारी, खाजगी कचेऱ्या झाल्या, नाटकं झाली, सिनेमा झाला. पण अजूनही त्यांच्या जीवनाला स्थैर्य येण्याचे लक्षण दिसेना. 1945 साली ते पुणे सोडून मुंबईस आले आणि माहीमच्या ओरिएंट हायस्कूलमध्ये शिक्षकीच्या जागेवर रूजू झाले. विद्यार्थ्यांचे एक लेखन सोडले तर तिथल्या वातावरणात सरकारी, खाजगी कचेऱ्यांइतकी अशुद्धता नव्हती. त्यामुळे पु.ल. तिथे तरी स्थिरपद होतील अशी त्यांच्या आप्तांची नि मित्रमंडळींची कल्पना होती. पण ती खोटी ठरली. थोडयाच दिवसांनी ते तिथूनही बाहेर पडले.

**शिक्षक : पु.ल. :–**

यापूर्वीच्या त्यांच्या इतर ठिकाणच्या नोकऱ्या 'निःश्रेयसांत' जमा झाल्या. पण माहीमच्या शाळेतली शिक्षकाची नोकरी त्यांना एक श्रेय बहाल करून गेली. सुनिताबाईही त्या शाळेत अध्यापनाचे काम करीत होत्या. ते दोघे वह्यांचे गठ्ठे बांधीत होते तेव्हा नियती त्यांना नकळत ऋणानुबंधाच्या धाग्याने एकत्र आणीत होती. हे त्यावेळी कुणालाच कळले नाही. जगाला हे कळायला आणखी एक वर्षाचा कालावधी लागला. 1946 साली कु. सुनीता ठाकूर सौ. सुनीता देशपांडे झाल्या. आता मात्र कुठेतरी स्थिर व्हायलाच हवे असा विचार पु.ल. करीत होते, पण इतक्यातच तसा योगायोग यावयाचा नव्हता. नाटक, चित्रपट यांच्या निमित्ताने पुन्हा भ्रमंति सुरू झाली. त्यातच अध्यक्ष वा वक्ता या नात्याने गळयात पडणाऱ्या माळांची भर। अशा घाईगर्दीतच एम.ए. च्या परीक्षेला बसायचा विचार त्यांच्या मनात घोळू लागला. लोकल मधल्या चेंगराचेंगरीतहि एखादा भाविक जीव खिशातली गीता काढून एखाद दुसरा अध्याय वाचून संपवतोच तशी पु.लं.नी जीवन कलहाच्या चक्रातही एल.एल.बी. नि बी.ए. ची पदवी पदरात पाडून घेतली आणि आता त्याच जिद्दीने एम्.ए.ची परीक्षाहि सन्मानपूर्वक उत्तीर्ण झाले.

**प्राध्यापक : पु.ल. :–**

बेळगांवच्या राणी पार्वतीबाई कॉलेजांत प्राध्यापकीच्या जागेवर रूजू झाल्यावर,आता मात्र आपल्या जीवनातली धावपळ संपून निश्चितपणाने कालक्रमण करता येणार असे पु.ल. मनाशी सुखस्वप्न रंगवीत होते. पण याहि वेळी 'रात्रिर्गमिष्यति भविष्यति' वगैरेसारखाच प्रकार घडला. उणी पुरी दोन वर्ष भरायच्या आतच संस्थेच्या अंतर्गत कारभाराशी जुळते न घेता आल्यामुळे त्यांना

तिथल्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. बेळगांवात थाटलेले बिऱ्हाड आवरून ते मुंबईला आले व बॉम्बे कॉलेजात (आताचे कीर्ति कॉलेज) अध्यापन करू लागले. त्यानंतर थोडयाच दिवसांनी मालेगांव येथे स्थापन करण्यात आलेल्या 'महात्मा गांधी विद्यामंदिर' या संस्थेच्या प्राचार्यपदी त्यांची नियुक्ती झाली, पण तिथेही काही मतभेद आडवा येऊन त्यांना आपल्या अधिकारपदाचा राजीनामा द्यावा लागला.

**नभोवाणीवरील पु.ल. :-**

1955 च्या डिसेंबरमध्ये ते ऑल इंडिया रेडिओत ड्रामा प्रोडयूसर (नाटय विभाग प्रमुख) म्हणून दाखल झाले. त्याबरोबरच पुणे रेडिओ स्टेशनवरील 'फार्म फोरम' या युनेस्को प्रणीत कार्यक्रमाची धुराही उत्तम रीतीने सांभाळून त्यांनी जाणकारांकडून वाहवा मिळविली. 1958 मध्ये रेडिओमार्फत ते विलायतेस गेले. 'मिडिया ऑफ मास एज्युकेशन' चा अभ्यास करण्यासाठी त्यांना युनेस्कोची शिष्यवृत्ति मिळाली होती. बी.बी.सी.च्या सहकार्याने त्यांनी नियोजित अभ्यासक्रम पुरा केला. दूरचित्रवाणीच्या तंत्राचेही त्यांनी तेथील वास्तव्यात सुक्ष्म निरीक्षण केले. ही सर्व हकिकत व प्रवासात आलेले तऱ्हेतऱ्हेचे अनुभव त्यांनी 'अपूर्वाई' या आपल्या प्रवासवर्णनपर ग्रंथात ढंगदार शैलीने कथन केले आहेत. मायदेशी परतल्यावर दिल्ली रेडिओच्या ध्वनिचित्र शाखेचे चालक म्हणून त्यांची नेमणूक झाली. व त्याच वेळी अखिल भारतीय नभोवाणी केंद्राचे डेप्युटी चीफ ड्रामा प्रोडयूसर हे अधिकार पद हि त्यांना बहाल करण्यात आले. पण हा सरकारी सन्मान ही दुपारच्या सावली सारखा अल्पजीवी ठरला. पु.लं.नी जेमतेम दोन वर्षे दिल्लीत काढली आणि तिथल्या दोन्ही अधिकारपदाचा राजीनामा देऊन 1961 साली पुन्हा मुंबई गाठली.

राजीनाम्याच्या कारणाचा अधिकृत तपशील अद्याप बाहेर आला नाही. पुढे मागे जरूर वाटलीच तर पु.ल. त्याची वाच्यता करतीलच पण तपशील कळला नसला तरी तत्व गुलदस्तात राहिले नाही. 'स्वतंत्र वनवृत्तिच्या घडी घडी सुखास्ते स्मरे' हेच खरे! अन्योक्तींत शुकाऐवजी पु.ल. शब्द घातला की झाले!

दिल्लीतील दोन वर्षाच्या वास्तव्यांत पु.ल.नी तिथल्या महाराष्ट्रीय समाजासाठी नवे नवे उपक्रम आखले. गडकरी दर्शन, कृष्णाकाठी कुंडल यासारखे नव्या धर्तीचे प्रयोग रंगभूमीवर यशस्वी करून दाखविले.

1962 साली त्यांना पुन्हा दोन वेळा परदेश गमनाची संधी मिळाली. पहिल्या सफरीत आग्नेय आशियातील महत्वाचे प्रदेश जपान व चीनचा काही भाग यांना भेट देऊन त्यांनी 'पूर्वरंग' या आपल्या दुसऱ्या प्रवासवर्णनपर ग्रंथात अपूर्वाईतल्या प्रमाणेच रोचक शैलीने आपले अनुभव निवेदन केले आहेत.

त्याच वर्षाच्या शेवटी त्यांनी अमेरिकेस प्रयाण केले ते साहित्यिक-पत्रकार मंडळाचे सभासद म्हणून. या प्रवासांतल्या अनुभवावर त्यांनी काही लिहिलेले दिसत नाही. पहिल्या दोन प्रवासवर्णनपर ग्रंथाप्रमाणेच याहि प्रवासाविषयीच्या आठवणी त्यांनी तिसरा ग्रंथ लिहून शब्दांकित करून ठेवाव्यात अशी शेकडो वाचकांची अपेक्षा असणार यात शंका नाही.

आणखी एक छोटासा पण वैशिष्टयपूर्ण प्रवास करण्याचा त्यांना योग आला तो 1963 साली. भारत सरकारने उत्तरेकडील संग्राम भूमीचे दर्शन घडविण्यासाठी महाराष्ट्रातल्या ज्या पाच साहित्यिकांना पाठविले होते त्यात पु.ल. यांचाही समावेश होता. 1963 नंतर मात्र त्यांनी स्वतःला कुठल्याच नोकरीत गुंतवून न घेता स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा निर्धार केला. लेखन, 'बटाटयाची चाळ', 'असा मी असा मी' यासारखे एकपात्री व 'वाऱ्यावरची वरात' यासारखे बहुपात्री प्रयोग, 'हसविण्याचा माझा धंदा' वगैरे गोष्टींवर सारे लक्ष केंद्रित करून रसिकांना हसविण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला. नुसते हसविण्याचा नव्हे तर हसविता हसविता त्यांना अंतर्मुख बनवून आत्मनिरीक्षण करायला लावण्याचे महान श्रेय ते संपादीत (आहेत.) हसविता हसविता प्रेक्षकांच्या अगर वाचकांच्या डोळयांत अश्रु तरळायला लावण्याची किमया करावी पु.लं.नीच। "The closest thing to humour is targedy" (हास्य आणि अश्रु यांच्या सीमारेषा परस्परांस भिडलेल्या असतात.) असे जेम्स हर्बरने कुठेसे म्हटले आहे. ते पु.लं.चे विनोदी वाङ्मय वाचीत असताना राहून राहून प्रत्ययास येते. इंद्रधनुष्यातल्या रंगांप्रमाणे त्यांच्या वाङ्मयातल्या हास्य आणि करूण छटाही एकमेकींत पूर्णपणे मिसळून गेलेल्या असतात. जिथे कारूण्य नाही तिथे विनोदही संभवू शकत नाही. म्हणूनच जिथे दैन्य, दु:ख, निराशा यांचा लवलेश नाही अशा स्वर्गात विनोदाचे अस्तित्व असण्याचे काही कारण नाही. अशी विनोदाची मार्मिक मार्क टेन या सुप्रसिद्ध विनोदी लेखकाने लावली आहे.'There is no humour in heaven' (स्वर्गात विनोद नसतो)

असे त्याचे म्हणणे आहे. म्हणजेच मानवी जीवनातल्या व्यथा, व्यंग, निराशा ज्यांना उमगू शकतात, जे त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहू शकतात त्यांनाच विनोद निर्मितीचे खरे मर्म आकलन झालेले असते यात शंका नाही. पु.लं.च्या विनोदा विषयी सर्वांना आकर्षण वाटते त्याचे कारण हेच आहे. वाचकांना केवळ हसविण्याकरिता तो जन्माला आलेला नसतो. अंतर्यामीच्या वेदनेवर हळुवारपणे फुंकर घालण्याचे त्याचे नियत कार्य असते. वर सांगितल्या प्रमाणे मानवी जीवनातली वैगुण्यं, अपूर्णता, अपेक्षाभंग हेच त्यांच्या विनोदाचे अधिष्ठान असते. "The secret source of humour is not joy but sorrow" (हास्याच्या मुळाशी दु:ख लपलेले असते सुख नव्हे!) दु:खातूनच त्याचा उगम झालेला असतो असे म्हणणाऱ्या मार्क व टेनला तरी याहून दुसरे काय अभिप्रेत असणार? आमच्या आयुष्याचा पेला दु:खाने भरलेला असला तरी त्याची दाहकता, तीव्रता चर्येवर उमटू न देण्यांतच पुरूषार्थ नाही का?"I laugh because I must not cry". (रडणे उचित नव्हे म्हणून हास्याचा आश्रय करणे मी आपले कर्तव्या समजतो) हे आब्राहम लिंकनचे वचन किंवा, "If I laugh at any mortal thing it is that I may not weep" (कोणत्याही नाशवंत वस्तूच्या दर्शनाने होणारे दु:ख मी हसण्यावारी नेऊन त्याची तीव्रता सौम्य करण्याचा प्रयत्न करतो) हे बायरनचे म्हणणे वरील विधानाला पुष्टि आणीत नाही काय?

जीवनातल्या दु:खाची तीव्रता कमी करून ते सुसह्य करण्याचे सामर्थ्य एकट्या विनोदांतच आहे हे कोण नाकारील? पण त्याचा अवलंब करणाऱ्याला वरील अवधान पाळता आले तरच त्या सामर्थ्याचा प्रत्यय इतरांना आणून देता येतो हे हि तितकेच खरे आहे हे अवधान सुटले की त्याच्या विनोदाला निव्वळ खुशामतखोरीचे, विदुषकीपणाचे थिल्लर रूप येत असते. वेडेवाकडे अंगविक्षेप आणि आचरट बडबड यांनी प्रेक्षकांना हसवू पाहणारा 'इनोदी' नटाचा एक वर्ग अस्तित्वांत आहे ना? येन केन प्रकारेण वाचकांना हसविणे एवढेच विनोदाच्या बाबतीत माफक नि सवंग ध्येय उराशी बाळगणाऱ्या लेखकांचीही हीच कोटी समजायला हवी. पु.लं.च्या विनोदाला याहून उच्चतर पातळी गाठता आली म्हणूनच वाचकांना व प्रेक्षकांना कमालीची आत्मीयता वाटत आली आहे.

विनोद विषय झालेल्यांनासुद्धा आपल्या व्यंगाचे हसू येऊन पु.लं.च्या हास्यात आपले

हास्य मिसळून टाकावेसे वाटावे अशा कौशल्याने ते विनोदाचे हत्यार वापरीत असतात."He Laughs not at the people but with the people." (तो इतरांना हसत नाही, इतरांबरोबर हसतो) हे कोणत्याशा विनोदी लेखकाविषयीचे एका पाश्चात्य टीकाकाराचे मत पु.लं.नाही बरोबर लागू पडेल अशी खात्री आहे. स्वतः पु.लं.नीच या मुद्दयाच्या बाबतीत एके ठिकाणी खुलासा केला तो मननीय आहे ते म्हणतात –

"वाड्.मय सृष्टीतला मी एक लहानसा कारागीर आहे. ज्याच्यावर मी शस्त्र चालवीन त्याची चांगली गुळगुळीत करीन, पण त्याला कुठेही जखम होऊ न देता!"

**पु.लं.चा विनोदाकडे पाहण्याचा दृष्टिकोण :-**

साहित्य अकादमीने आयोजित केलेल्या एका समारोहाच्या वेळीही त्यांनी विनोदाकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन अशाच सुंदर शब्दात व्यक्त केला होता. 'व्यक्ति आणि वल्ली' या ग्रंथाला अकादमीकडून मिळालेले पारितोषिक स्वीकारताना ते म्हणाले होते –(4)

"नैराश्याचा अंधःकार नाहीसा करणे, उदासीनतेची कोळिष्टके झटकून टाकून, ढोंगाचा फुगा फोडणं, दुःखाश्रु पुसणे हे माझ्या विनोदाचे प्रयोजन आहे. विनोदाचे साधन परमेश्वराने माझ्या हाती तेवढयासाठीच दिले असावे... माझा विनोद चावरा बोचरा न होऊ देण्याची खबरदारी मी घेतो. कमरेखाली मी वार करीत नाही. पण कोणी कोणी कटिमेखलाच वर सरकविल्याचा अनुभव अधूनमधून येतो..."

त्यांच्या विनोद बुद्धीचे हे वैशिष्टय विशद करून प्रा.मं.वि. राजाध्यक्षांनी मार्मिक भाष्य केले आहे ते म्हणतात –(5)

"... असा हा लोकविलक्षण कलावंत. मूळचे दैवाचे देणे असेल, पण ते निष्ठेने आणि व्यासंगाने समृद्ध केले. अनेक वर्षे त्याने महाराष्ट्राला निर्मळपणे हसविले आणि त्याची करूणाही जागती ठेवली, पण ते केवळ लोकानुरंजन नव्हे. त्यामागे खंबीर विचार आहे. समाजाविषयी गाढ आस्था आहे हे जाणून रसिक महाराष्ट्राने त्याला भरभरून प्रेम दिले. सगळया भारतातील जाणकारांत त्यांच्याविषयी कौतुकादराची भावना आहे. महाराष्ट्राची मान त्यांच्यामुळे उंचावली आहे..."(ललित मासिक फेब्रुवारी 1965)

वरील अभिप्रायांतील एका विधानाकडे वाचकांचं लक्ष वेधून घेऊ इच्छितो. पु.लं.च्या विनोदाचे वैशिष्टय स्पष्ट करून सांगण्याच्या दृष्टीने या विधानाला फार महत्व आहे. पु.लं.नी महाराष्ट्राला निर्मळपणे हसविले, पण केवळ लोकानुरंजन म्हणुन नव्हे; त्यामागे खंबीर विचार आहे. समाजाविषयी गाढ आस्था आहे असे राजाध्यक्षांनी म्हटले आहे.

पु.लं.च्या सबंध विनोदी वाङ्.मयाचे वैशिष्टय राजाध्यक्षांनी या एक दोन वाक्यांत सांगून टाकले आहे. पु.लं.च्या विनोदामागे जसे त्यांचे निर्मळ निरागस मन आहे तशी चिंतनशील प्रकृतीही आहे हे कदापि विसरता येणार नाही. त्यांच्या विनोदाला असलेली ही वैचारिक बैठक ज्यांना ध्यानात घेण्याची गरज वाटत नाही, केवळ करमणूक म्हणूनच जे त्यांच्या विनोदाकडे पाहताना ते कथेकरी बुवांचा पूर्वरंग आटोपल्यावर त्यांच्या आख्यानासाठी गर्दी करून सोडणाऱ्या श्रोत्यांच्या जातीचे मला वाटतात. बुवांच्या आख्यानातील गाणं, गोष्टी, निवेदनचातुर्य वगैरे मालमसाला मनोरंजनाच्या दृष्टीने कितीही महत्वाचा असला तरी तो सारा खटाटोप जो पूर्वरंग श्रोत्यांच्या चित्तावर ठसावा म्हणून बुवांना करायचा असतो त्याचे महत्व लक्षात न घेऊन कसे चालेल? आमच्या विदर्भ मराठवाडयाकडल्या भागात सर्वांना सुपरिचित असलेल्या गुंडामहाराज बंडामहाराज देगलूरकर यांच्या भजनाच्या कार्यक्रमाला हजारो श्रोते उपस्थिती लावून मंत्रमुग्ध नागाप्रमाणे डोलत असते. पण त्यापैकी बहुतेकांना भजनाचा संगीत थाटच आकृष्ट करीत असे. शास्त्रशुद्ध गायकीच्या ढंगानं भजनं आळविण्याची महाराजांची पद्धती खरोखरच मोठी बहारीची असे पण महाराजांच्या सुरेलपणांत अध्यात्माचा, भक्तिभावाचा आणखी एक सूर मिसळलेला असे हे न ओळखता संगीताच्या दृष्टीने त्यांच्या गायकीचे मूल्यमापन करणे हे अन्यायाचे होणार नाही का?

'पु.लं.'च्या विनोदामागची वैचारिकता ध्यानांत न घेता त्यासंबंधी बोलणे अगर लिहिणे हेही असेच अन्यायाचे होणार आहे. पु.ल. म्हणजे केवळ विनोद अशी स्वतःची समजूत करून घेणारे हजारो वाचक या बाबतीत खुद्द लेखकावर कसा अन्याय करीत आहेत याविषयी प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या एका अंकात अतिशय अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. त्यातला काही भाग इथे उद्धृत करणे मला आवश्यक वाटते.

'हसविण्याचा माझा धंदा' असे स्वतःबद्दल पु.लं.नीच स्वतः म्हणून ठेवल्यामुळे 'पु.ल. म्हणजे विनोद' हे समीकरण वाचक प्रेक्षकांच्या मनात दृढमूल होण्यास आणखीनच मदत झाली आहे. अशा

अर्थाचे विधान केल्यावर प्रा. कुलकर्णी पुढे लिहितात --(6)

"वास्तविक पु.ल. देशपांडे यांचे कोणतेही वाङ्मय वाचीत असताना प्रथम काही जाणवत असेल तर त्यांची प्रखर वैचारिक भूमिका. आपली संस्कृती, आपले संस्कार, आपल्या कला, आपले वाङ्मय, आपले राजकारण आणि समाजकारण याचे अतिशय डोळस निरीक्षण. या त्यांच्या वैचारिकतेमुळेच त्यांना करणे अत्यावश्यक वाटते. या वैचारिकतेमागे त्यांचे अत्यंत संपन्न, अष्टपैलू आणि जागरूक अशा कलावंताचे व्यक्तिमत्त्व उभे असल्याने यांची ही वैचारिकता अतिशय आत्मनिष्ठ अशा स्वरूपात सदैव आविष्कृत होते. या जागरूकतेपोटी समाजातील सर्व क्षेत्रातील असंख्य विसंगती, अगणित सोंगे ढोंगे, विपरित कल्पना आणि अपरिमित मुखवटे इत्यादी रोगट प्रवृत्तींचा ते सदैव समाचार घेताना दिसतात. त्यांचे अवलोकन जसे सुक्ष्म असते तसेच ते अद्ययावत असते, दृष्टि जशी चौफेर तसाच तिचा हेतु अतिशय उदात्त आणि संस्कृतिनिष्ठ असतो. समाजाचे मोहरे 'श्रेयस'कडून झपाटयाने 'प्रेयस'कडे वळत असलेले पाहून ते अस्वस्थ होतात आणि उपहास उपरोधाच्या प्रखर वाग्बाणांनी ते अशा प्रवृत्तींवर तुटून पडतात.

"हा हेतु, ते मुख्यत्वे 'विनोद' या साधनाद्वारे मोठया परिणामकारकतेने साध्य करतात. 'विनोद' हा त्यांचा अत्यंत प्रभावी असा हुकमी एक्का आहे. हा हुकमी एक्का नेमका डाव मारतो, फड जिंकतो आणि आपल्या कुर्रेबाजपणाने इतरांवर सदैव कुरघोडी करून मोठया डौलाने पदन्यास करीत राहतो."

"प्रखर वैचारिकता हुकमी विनोदाच्या साहाय्याने अगदी सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचविण्यात पु.ल.देशपांडयांइतके यश आतापर्यंत कोणालाच प्राप्त झाले नव्हते."

वरील विवेचनांतून एक निष्कर्ष येतो तो हा की, सर्वसामान्य वाचकांनी विनोद हे पु.लं.चे साधन नसून साध्य आहे अशी गैरसमजूत करून घेतल्यामुळेच त्यांना त्यांच्या व्यक्तित्वाची नीटशी जाणीव झाली नाही. पु.लं.चा पिंड जसा कलावंतांचा आहे तसाच समाजधुरीणाचाही आहे हे ध्यानात घेतल्याशिवाय त्यांच्या विनोदाचे खरे स्वरूप आकलन होऊ शकणार नाही.

शास्त्रीय चिकित्सेच्या पातळीवरून पु.लं.च्या विनोदाची छाननी करणे अशक्य नसले तरी अवघड खासच आहे. हास्य विनोदाचे शास्त्र बनविणाऱ्यांनी तसे पाहिले तर खूपच चर्चा केली.

आहे. विनोदाची विभावकारणे, त्याचा हेतु, त्याचे प्रकार वगैरे गोष्टींसंबंधी आजपर्यंत पुष्कळच खल होऊन गेला आहे. पण शास्त्रकाराच्या सिद्धांतांचा नि चर्चेचा आधार घेऊनही पु.लं.च्या विनोदाला शास्त्रीयतेच्या चौकटीत बसविता येईल असे वाटत नाही.

शास्त्रकारांनी आपल्या कुवतीप्रमाणे रंगांना ठराविक नांवे दिली आहेत. पण संध्याकाळी मावळतीच्या कडेवर अनंत रंगछटा तरळत असतात त्यांना कोण–कोणत्या नावाने संबोधायचे? प्रियकराला वश करताना ज्या अनेकविध विभ्रमांचा युवतीला आश्रय करावा लागतो त्याचे वर्गीकरण नि चिकित्सा कुणाला नि कशी करता येणार? पाळण्यांत मूठ चोखीत पडलेल्या बालकाकडे एकटक पाहताना मातेच्या डोळयातुन जे कौतुक ओसंडत असते, तिच्या अंतर्यामात ज्या वात्सल्याच्या उर्मि उचंबळून आलेल्या असतात त्याची शास्त्रीय कारणमीमांसा ती काय करता येणार?

कोणत्याही विनोदी लेखकाच्या लेखनात श्लेष, कोटया, अतिशयोक्ती, वक्रोक्ती, विडंबन, उपहास, उपरोध ही विनोदाची अंगे कमी अधिक प्रमाणात आढळून येतात. तशी ती पु.लं.च्याही लेखनात आढळून येतात. तसेच शब्दनिष्ठ, कल्पनानिष्ठ, स्वभावनिष्ठ इत्यादी विनोद प्रकारांचाही त्यांच्या वाड्.मयात आढळ होतो. पण एवढयाने त्यांच्या विनोदाचे स्वरूप स्पष्ट झाले असे मात्र कुणी समजू नये. फार तर स्थूलमानाने त्याचे वर्णन करता आले असे म्हणता येईल. तसेच विस्मरण, अनपेक्षितपणा, विसंगती वगैरे विनोदनिर्मितीची जी काही दहावीस किंबहुना अधिकच विभावकारणे साहित्य शास्त्राकारांनी निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे तेवढयांचाच पु.लं.च्या विनोदात आढळ होतो असेही समजण्याचे कारण नाही. आणि समजा विनोदाची एकूण एक विभाव कारणे त्यांच्या वाड्.मयातून आपण शोधून काढली तरी तेवढयावरून त्यांच्या विनोदाचे अंतःसौंदर्य आपणाला आकलन झाले असा मुळीच दावा करता येणार नाही. सगळेच गायक रिषभ आणि पंचम वर्ज्य कयन मालकंस आळवीत असतात. पण केसरबाईच्या कंठातून या रागाची सुरावट निपजू लागली म्हणजे कारंजाच्या तोटीतून सहस्त्रावधि जलधारा उसळत असल्याचा मनाला आभास होतो. एरव्ही हाच राग एखादा अलबत्या गलबत्या आराहोवराहोचे अन् वादी संवादीचे सारे संकेत पाळून आळवू लागला तरी त्याच्या सुरांना पॉयशाच्या फवाऱ्याचा वास येतो. असे का व्हावे? उपमा, उपमान, साधर्म्य आणि साधर्म्यवाचक शब्द एवढया गोष्टी असल्या म्हणजे उपमा अलंकार सिद्ध

होतो. पण या लक्षणांचा आढळ होऊनही इतरेजनांच्या उपमेत कालिदासाच्या उपमेतले सौंदर्य का प्रतीत होऊ नये? याचा सरळ अर्थ असा की, अलंकाराचे अंत:सौंदर्य त्याच्या बाह्य लक्षणामुळे सिद्ध झालेले नसते. कवीच्या जन्मजात प्रतिभा सौंदर्याचाच तो एक शब्दरूप अविष्कार असतो, ते शास्त्राच्या चिमटीत कसं काय पकडता येणार? 'हे शब्देविण संवादिजे' अशापैकीचाच हाही प्रकार आहे.

पु.लं.च्या विनोदासंबंधीही असेच म्हणता येईल. शास्त्रीयतेच्या पातळीवरून एक वेळ त्यांच्या विनोदाच्या बाह्य स्वरूपाची चिकित्सा करता येईल, परंतु त्याचे अंतरंग स्पष्ट करून सांगणे, त्याचा अभिजातपणा, त्याची प्रसन्नता, त्याचा निर्मळपणा या गुणांचे विवरण करणे मात्र कठीण काम आहे. पण हेच अधिक महत्वाचे अन् मोलाचे वाटत आहे.

विनोदबुद्धी असणाऱ्या साऱ्याच लेखकांना 'निर्मळ' विनोद करता येतो असे नाही. पु.लं.च्या साहित्यात आपणांस विनोदातला निकोपपणा आढळतो. कारण जीविताकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण निरोगी अन् खेळकर आहे. त्याच कुचाळीचा, असूयेचा किंवा तुच्छतेचा लवलेश ही कुणाला आढळून यावयाचा नाही. मग विनोदविषय झालेली व्यक्ति वा विषय काल्पनिक असो अथवा वास्तव सृष्टीतील असो. या संदर्भात पु.लं.नी 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाला जोडलेल्या लहानशा प्रास्ताविकांतले एक विधान उद्‌धृत करावेसे वाटते. ते म्हणतात, 'ह्या नाटकातील प्रमुख पात्रांची वेषभूषा करताना कोणत्याही हयात अगर मृत अशा प्रसिद्ध व्यक्तीशी साधर्म्य दिसेल अशी वेशभूषा टाळावी. विशेषत: आचार्यांची वेशभूषा आणि रंगभूषा करताना ही खबरदारी घेणे आवश्यक आहे.

सर्वोदयवादी आचार्यांच्या नी गुरूजींच्या वर्तनांतल्या दंभाचाराचा प्रच्छन्न उपहास पु.लं.नी प्रस्तुत नाटकात केला असला तरी कोणत्याही विवक्षित व्यक्तीला टीकाविषय बनविण्याच्या मोहाला ते बळी पडले नाहीत. याच्या नेमका उलट प्रकार काही नाटककारांच्या नाटयकृति पाहताना दृष्टीस पडतो. म.म.दत्तो वामन पोतदार, बालगंधर्व यांच्या बोलण्या चालण्याचे अकारण विडंबन करून त्यांना हास्यास्पद करून सोडण्यात या नाटककारांनी भूषण मानले आहे. वैयक्तिक कुचाळी केल्याने मोठाच विनोद साधता येतो अशी या नाटककारांची कल्पना असावी. सद्‌भिरूचीची

लक्ष्मणरेषा ओलांडण्याचे दु:साहस पु.लं.चा विनोद चुकूनही करीत नाही, म्हणूनच सवंग लोकप्रियतेचा कांचनमृग त्यांना फसवू शकत नाही.

लेखनाप्रमाणे व्याख्यानांतूनही त्यांच्या विनोदबुद्धीचा प्रकर्षाने आढळ होत अस्तो. साहित्यसंमेलन, नाटयसंमेलन, सत्कार समारंभ, तमाशा, परिषद वगैरे सारख्या प्रसंगी कधी अध्यक्ष म्हणून तर कधी प्रमुख वक्ता म्हणून त्यांनी केलेली भाषणे खुसखुशीत, मार्मिक, रसाळ नी विचार परिलुप्त वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुना म्हणून श्रोत्यांच्या निरंतर लक्षात राहतील असा मला भरवसा आहे.

श्रोत्यांच्या जांभयावरून वक्त्याची विद्वता ठरविणाऱ्या मराठी सभा संमेलनाच्या चालकांना पु.लं.नी जोराचा धक्का देऊन त्यांना जाग आणली! अध्यक्षीय भाषणाच्या वेळी शस्त्रक्रियेच्या वेळच्या वातावरणातले गांभीर्य असलेच पाहिजे या परंपरागत संकेताला त्यांनी सुरूंग लावला. नांदेड इथे भरलेल्या नाटयपरिषदेच्या अधिवेशनाच्या वेळी अध्यक्ष या नात्याने त्यांनी दोन वर्षापूर्वी केलेले भाषण ज्यांनी ऐकले असेल त्यांना सहज प्रचीती आली असेल. ग्वाल्हेर, इंदूर, औदुंबर इत्यादी ठिकाणी भरलेल्या प्रादेशिक साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून त्यांनी केलेल्या वक्तव्याविषयी असेच म्हणता येईल.

लेखन आणि सभासंमेलनातील भाषणे यांच्या प्रमाणे खाजगी गप्पागोष्टी-नाही पु.ल. आपल्या मार्मिकतेचा 'टच' देऊन रंगत आणीत असतात. त्यांच्या साहित्यावर वाचक जितके फिदा होतात तितकीच त्यांची मित्रमंडळी त्यांच्या गप्पाष्टकावरही लुब्ध झालेली असते हे आता सर्वांना ठाऊक झाले आहे. या गप्पात नकला येतील, कोटया येतील, साहित्यावर चर्चा येईल, नव्या लेखकाचे कौतुक होईल, फावल्या वेळात रियाज करून सहा महिन्यांत संगीतालंकार बनलेल्याचे ईषत् वस्त्रहरण होईल, वीस पंचवीस फिडले, दहा पांच बासऱ्या, चार दोन क्लॅरिओनेट, एक पियानो अन् पाव डझन बँजो एवढया ताफ्याच्या पार्श्वसंगीतावर रामदास स्वामींच्या जीवनावर बॅलेट बसविण्याची 'आयडिया' प्रसविणाऱ्या प्रतिभावंताला शेल्यापागोटयाचा आहेर मिळेल... अन् हे सारे कुणालाही दुखवता सवरता!

ज्या सहानुभावाच्या ओलाव्यामुळे पु.लं.च्या विनोदाला प्रतिष्ठा आली तो त्यांच्या

जीवनात शब्दापुरतांच मर्यादित राहिला नाही. प्रत्यक्ष कृतीतून त्याचा अविष्कार करून त्यांनी साऱ्यांना चकित करून सोडले आहे. पानशेतच्या प्रलयाच्या वेळी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी त्यांनी एक रकमी दहा हजार रूपये देऊन हजारोजणांचा दुवा घेतला आहे. चीन व पाक आक्रमणाच्या वेळीही त्यांनी भारत सरकारच्या युद्धफंडास असेच भरघोस सहाय्य करून आपल्या कर्तव्यपरायणतेची व औदार्याची ग्वाही पटविली आहे. भारत–पाक युद्धाच्या वेळी त्यांनी ब्लड बँकेसाठी निरनिराळे कार्यक्रम करून चाळीस हजार रूपयांची मदत दिली, ती तर त्यांच्या दानतीची सर्वात उंच फडकणारी पताकाच म्हटली पाहिजे. याशिवाय पार्ले येथील म्युझिक सर्कलच्या संकल्पित इमारतीसाठी त्यांनी आजपर्यंत दिलेली हजारो रूपयांची देणगी व इतर लहानमोठया उपक्रमांच्या साहाय्यार्थ दिलेल्या रकमा लक्षात घेतल्या म्हणजे केवळ बोलाच्या कढीभातावर पंगत उठवू पाहणाऱ्या शब्दसृष्टीच्या ईश्वराहून पु.लं.ची जातकुळी अगदी वेगळी असल्याची खात्री पटते.

लोककामासाठी मुक्त हस्ताने मन आणि धन वेचणारा हा दाता आपल्या तनूपुरताच कृपणपणा कशाला दाखवील? विनोबाच्या भूदान यात्रेत सामील होऊन त्यांनी काही काळ आपला देहही कष्टविला आहे. विनोबांबरोबरच मैलोगणती पायी प्रवास करून त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाच्या एका वेगळयाच पैलूचे दर्शन घडविले आहे. नुसत्या शरीरानेच नव्हे तर त्यांच्या आत्म्यानेही विनोबांच्या सान्निध्यात परमार्थाची केवढी वाटचाल केली आहे. किती दूरचा पल्ला गाठला आहे हे त्या महर्षीवरील लेखात आपणांला कळून येते.

संगीताच्या क्षेत्रात पु.लं.नी जसा कुठल्याही घराण्याचा गंडा बांधला नाही, तशी साहित्याच्या प्रांतात कुठल्याही संप्रदायाची मुद्रा आपल्या कपाळावर उमटवून घेतली नाही. धार्मिक क्षेत्रात अमुक एका पंथाचा टिळा अगर माळ धारण करण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही तशी राजकीय क्षेत्रांतही कोणत्याच पक्षाची टोपी त्यांनी आपल्या डोक्यावर चढविली नाही.

आगरकरांना गुरूस्थानी मानणाऱ्या आपल्या आजोबाकडून बुद्धीप्रामाण्य आणि सुधारकी मते त्यांनी उचलली असली तरी निष्ठाशून्य नास्तिकता अगर धर्मलंडपणा त्यांना शिवला नाही. हिंदु धर्मात, हिंदु संस्कृतीत जे जे विधायक आहे, जोपासण्या लायक आहे त्याचा पुरस्कार करण्यात त्यांना यत्किंचितही कमीपणा वाटत नाही. राजकीय पक्षाची टोपी त्यांनी चढविली नसली तरी त्यांना

राजकिय मते नाहीतच असे मात्र म्हणता येणार नाही. समर्थाचा दासबोध नित्यनेमाने वाचणारा मनुष्य राजकारणापासून दूर राहील हे शक्य तरी आहे का? बारकाईने पाहणाऱ्याला त्यांच्या राजकिय निष्ठा कोणत्या प्रकारच्या असाव्यात याची कल्पना करता येते. महात्माजींच्या विभूतिमत्वापुढे त्रिवार नतमस्तक होण्यात ते स्वत:ला धन्य समजतात पण त्याबरोबरच त्यांच्या राजकारणाला त्यांच्याच अनुयायांनी आणलेल्या बुवाबाजीच्या कळेची त्यांना मनस्वी चीड येते. शुभ्र खादीच्या आड दडलेला दिखाऊ हास्य, नकली नमस्कार अन् नाटकी विनय या मागे लपलेला कुटिलपणा त्यांना सहज ओळखता येतो. गांधींची सुताने स्वराज्य गाठायची भाषा ज्याला उमगत नाही, उलट ठोशास ठोसा द्यायला सांगणारी टिळकांची रोखठोक भाषा ज्याला परिचयाची वाटते अशा सरळ, भाबडया पण व्यवहारनीति जाणणाऱ्या फणसळकर मास्तरांचे मोठे हृद्य शब्दचित्र त्यांनी रेखाटले आहे. या फणसळकर मास्तरांचे जे काही राजकिय तत्वज्ञान असेल तेच पु.लं.चेही असावे असा परवा परवापर्यंतचा नुसता तर्क होता. पण आता त्या बाबतीत तर्क करण्याचे कारणच उरले नाही. पु.लं. नी अगदी नि:संदिग्ध शब्दात आपली भूमिका स्पष्ट करून सांगितली आहे. 1963 साली प्रसिद्ध झालेल्या श्री.दि.वि. गोखले यांच्या छोटया पुस्तिकेत त्यांनी जी प्रस्तावना जोडली आहे तिच्या शब्दा शब्दातून त्यांच्या प्रखर पण वास्तववादी राजकिय निष्ठेची आपणांस ओळख पटते. 'माओचे लष्करी आव्हान' असे त्या पुस्तिकेचे नाव आहे. गोखल्यांनी तळमळीने, आत्मीयतेने नि साक्षेपीपणाने सदरहू पुस्तिकेत आपले विचार मांडले आहेत. तितक्याच जिव्हाळयाने अन् नि:संदिग्धपणाने पु.लं.नी गोखल्यांच्या विचारसरणीची भलावण केली आहे.

आकाराने लहान पण गुणवत्तेच्या दृष्टीने महान ग्रंथाची बरोबरी करू शकणाऱ्या गोखल्यांच्या पुस्तिकेचा परिचय करून देताना पु.ल. म्हणतात --(7)

"हा लहानसा ग्रंथ म्हणजे आमच्या नेत्यांच्या नाकर्तेपणाची आणि एका राजकिय न्यूनगंडाने पीडित अशा लोकांची केविलवाणी कथा आहे. घरच्या म्हातारीलाच काळ असलेल्या महापुरूषांच्या महापतनाचा हा ताजा इतिहास आहे. आपल्या राजकारण पांडित्याचे दुष्टांतल्या दुष्टांचे देखील हृदय परिवर्तन करू म्हणणाऱ्या अहंकाराच्या पराजयाची ही विलापिका आहे. 'रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति' या षंढ सूत्राला मानवतेचे महन्मंगल स्तोत्र समजणाऱ्या वाचि वीरांच्या भ्रमनिरासाची

ही मर्मभेदक कहाणी आहे. शत्रू दाराशी धडका देत असताना जगाला शांतिपाठ देत हिंडणाऱ्या आणि स्वत:चे घर पेटत असताना दुसऱ्यांची कोळिष्टके झाडायला धावून जाणाऱ्या आमच्या वांझोटया नेतृत्वाचे जगभर हसे झाले त्याचा हा प्रथमाध्याय आहे. दुबळयांची अहिंसा आणि नपुसकांचे शील त्याला कवडीचीही किंमत नसते. हा जगाच्या इतिहासाने लाख वेळा शिकविलेला धडा विसरल्याबद्दल ही शिक्षा आहे. आणि शिवरायाचे प्रताप आठवायचे तिथे हिंसा अहिंसेच्या विचारांचा खुळखुळा वाजवीत बसण्याच्या पापाबद्दल घ्यावयाचे हे प्रायश्चित आहे.''

सबंध प्रस्तावनाच अशा रसरशीत, जळजळीत शब्दांनी भरलेली आहे. इतक्या उत्कटपणे अस्मितेला आवाहन करणारे प्रास्ताविक वाचल्यानंतर तरी पु.लं.च्या राजकिय दृष्टीकोणाबाबत कोणाच्या मनात संदेह राहू नये. भगवान श्रीकृष्ण, शिवबा, रामदास, लो. टिळक या साऱ्या विभूतींना नी महापुरूषांना जी राजनीति अभिप्रेत होती तिच्यावरच पु.लं.चीही श्रद्धा आहे. याविषयी तरी आता किंतु राहिला नाही.

इष्काचा रसरंग उधळणाऱ्या शाहीरांनीच प्रेतांना खडबडून उठवणारी वीररसाची कवने रचली. रसिकांना खदखदून हसविणाऱ्या पु.लं.च्या लेखणीतले हे ओज ही त्याच नवलाईचा पुन: प्रत्यय आणून देत नाही काय?

चीनने भारतावर आक्रमण केल्यावर आमच्या राज्यकर्त्यांनी जे पडखाऊ धोरण स्वीकारले ते पाहून पु.लं.ना कमालीचे वैषम्य वाटते. धूर्त राष्ट्रांनी टाकलेले डावपेच न ओळखण्या इतका नेत्यांचा बुद्धीभ्रंश झालेला पाहून त्यांना सात्विक संताप येतो. कसायाला भाई म्हणून त्यांच्या खांद्यावर डोके ठेवणाऱ्या आमच्या भोंगळ मानवता धर्माची त्यांना कीव येते. आग आणि पाणी, लांडगा आणि शेळी, अंधार आणि प्रकाश यांचे सख्य होऊच शकत नाही, या त्रिकालाबाधीत सिद्धांताकडे दुर्लक्ष करून विनाशाला आमंत्रण देणाऱ्या आमच्या हेकेखोरपणाचा त्यांना उबग येतो. शांततामय सहजीवनाचा फसवा मंत्र घोकत घोकत स्वत:ची नि स्वत:बरोबर साऱ्या राष्ट्राची वंचना करणाऱ्या अहंमन्य पुढाऱ्यांची त्यांना चीड येते. आणि मग अंतर्यामांतली ही खळबळ ही तळमळ कधी प्रस्तावनेच्या तर कधी स्वतंत्र लेखाच्या रूपाने ते समर्थपणे व्यक्त करतात.

आणखी एका पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेतही पु.लं.नी अशाच परखड शब्दांत

राष्ट्रीयत्वाची भावना बोलून दाखविली आहे. डॉ. वसंत अवसरे यांच्या 'लाल नदी निळे डोंगर' या प्रवासवर्णनपर पुस्तकाला पुरस्कार जोडताना पु.ल. लिहितात –(8)

"आज भारतीयांच्यात दुर्दम्य राष्ट्रीय अहंकार निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या देशांतले बहुसंख्य लोक हिंदू आहेत तिथे कुणीही यावे आणि त्यांच्या संस्कृतीचे लचके तोडावे असला प्रकार चालू आहे त्याला बहुतांशी हिंदूंचे दौर्बल्यच कारणीभूत आहे. दुबळयांच्या मदतीला देवही जात नाही. म्हणून काय एका दिव्य परंपरेचा त्याग करायचा? कोळिष्टके झाली म्हणून घर जाळायचे? स्वजनांचा पदोपदी तेजोभंग करून माणूसकीचे कोरडे गहींवर काढणाऱ्या ह्या तथाकथित नेत्यांच्या बरळण्याला वेळीच पायबंद घातला नाही तर दुखंड भारत शतखंड होऊन जाईल. हिंदूंच्या ह्या देशांतले हिंदु धर्माचेच अधिष्ठान गेले पण धर्मनिरपेक्ष शासनाने इतर धर्मीयांना धार्मिक पातळीवर अल्पसंख्यांक म्हणून त्यांचे हवे तसे लाड चालूच ठेवले आहेत. धर्मनिरपेक्ष ह्याचा अर्थ हिंदुधर्म निरपेक्ष असा घ्यायचा की काय अशी शंका यापूर्वी कोणताहि धार्मिक विचार न करणाऱ्यांना सुद्धा आता येऊ लागली आहे. अल्पसंख्यांकांचे धार्मिक पायावरचे प्रतिनिधित्व ह्या बुद्धीनिष्ठ लोकशाहीतही आपले चालूच आहे! राष्ट्रीय कायदे देखील त्यांना संपूर्णपणे लागू नाहीत. लोकशाही याचा अर्थ हिंदूची स्वाभिमानशून्यता असा घ्यायचा की काय?"

... आणि अशा जळजळीत शब्दांत आपले विचार प्रकट केल्यावर पु.ल. असा सवाल टाकतात,

"जगातला प्रत्येक देश आज राष्ट्रीयत्वाचा अहंकार जागृत ठेवण्याची पराकाष्ठा करीत आहे. आमचाच देश असा अभागी का असावा?"

पु.लं.चा राजकारणाकडे पाहण्याचा असा रोखठोक व्यवहारी दृष्टिकोन असल्यामुळेच शठांशी शठ नीतीनेच वागायला हवे या लेखकाच्या मताचा ते निःशंकपणे पुरस्कार करतात. प्रवास वर्णनाच्या या पुस्तकात लेखकाने केलेल्या निसर्ग वर्णनापेक्षाही त्यांतील विदारक सत्यावर त्याने टाकलेला प्रकाश पु.लं.ना अधिक मोलाचा वाटतो. राज्यकर्त्यांच्या हलगर्जीपणाचे स्पष्ट शब्दात केलेले वर्णन त्यांना अपूबीचे वाटते याचे कारण त्यांच्या हृदयांत धगधगणारी राष्ट्रीयत्वाची प्रखर भावना!

पु.लं. सारख्या साहित्यिकाला राजकीय विषयावर लिहिण्याचा कितपत अधिकार पोहोचतो असा या संदर्भात प्रश्न उपस्थित करणे अप्रस्तुत ठरणार आहे. द्रौपदीच्या निरीला हात घातला जात असताना भीम दु:शासनाचे हात जाळायला सहदेवाला अग्नि आणायला सांगतो ते नीतिशास्त्रावरचे पाठ वाचून नव्हे! बछडयावर बंदूकीचा नेम धरणाऱ्या शिकाऱ्याच्या नरडीचा घोट घ्यायला वाघीण चवताळून त्याच्या अंगावर धावून जाते ती अपत्यसंगोपन शास्त्राचा तिने कुठे डिप्लोमा मिळविलेला असतो म्हणून नव्हे! अपत्यसंरक्षणाच्या उपजत प्रेरणेने त्या बछडयाची जन्मदात्री शिकाऱ्यावर तूटून पडते, अन्यायाच्या प्रतिकाराची सहज भावना भीमाला दु:शासनाचे हात जाळायला उद्युक्त करते. राष्ट्रप्रेमाच्या याच स्वाभाविक उर्मीतून पु.लं.नी राजकिय प्रश्नाचा उहापोह आपल्या प्रस्तावनेतून केला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही!

राजकारणाच्या क्षेत्रात आपला काही अधिकार आहे असे स्वतः पु.लं.नाहि वाटत नाही. उलट 'माओचे लष्करी आव्हान'या पुस्तिकेतले लेख प्रथम महाराष्ट्र टाईम्समधून क्रमशः प्रसिद्ध होत असताना ते वाचल्यानंतर चीनच्या आक्रमणासंबंधीचा विषय आपणाला नीट समजू शकला अशी प्रस्तावनेतच त्यांनी कबुली दिली आहे. त्यांच्या विनम्र स्वभावाला साजेशी ही कबुली असली तरी त्यांची राष्ट्रप्रेमाची भावना वरवरची आहे, खोटी आहे असे मुळीच म्हणता येणार नाही. त्यांची साहित्यावरली भक्ति जितकी उत्कट आहे, त्यांची संगीतविषयक आसक्ती जितकी अस्सल आहे तितकीच त्यांची राष्ट्रनिष्ठाही प्रखर आहे, ज्वलंत आहे असे माझे मन मला ग्वाही देत आहे.

1962 साली पु.ल. साहित्यिक – पत्रकार मंडळाचे सभासद म्हणून अमेरिकेला जाऊन आले तेव्हा त्या ऐश्वर्यसंपन्न देशांतल्या कोणकोणत्या गोष्टीचा ठसा त्यांच्या संवेदनशील कलासक्त मनावर उमटला होता? तिथल्या गगनचुंबी इमारतीचा? अर्धनग्न युवतीच्या मादक सौंदर्याचा? चंद्रलोकावर जाण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या वैज्ञानिकांच्या कल्पक बुद्धीचा? छे:! छे:! यापैकी आपल्या जातभाईना आवर्जून सांगण्यासारखी एकही गोष्ट त्यांना महत्वाची वाटली नाही. मायदेशी परतल्याबरोबर ज्या दोन आठवणींचा त्यांनी जाहीररीत्या उच्चार केला त्यापैकी एक होती तिथल्या एका नकलाकारासंबंधीची आणि दुसरी होती एका बुटपॉलिशवाल्या विषयीची! अमेरिकन नकलाकाराने भारताच्या पंतप्रधानांची

नक्कल करून प्रेक्षकांत खसखस पिकवली होती आणि टाळया घेतल्या होत्या. पण ती नक्कल पाहताना पु.लं.ना मात्र लाख इंगळया डसल्याप्रमाणे दु:ख झाले होते. कारण त्या नकलेतला पंतप्रधान एखाद्या दुबळया, रडव्या, मार खाणाऱ्या पोरासारखा नकलाकाराने उभा केला होता. तो रडत रडत केनेडींना आपणाला चीनने कसे मारले हे सांगून त्याची खोड मोडण्याबद्दल त्यांना गळ घालीत होता! भारताची नामुष्की वेशीवर टांगणारी ती खोडसाळ नक्कल पाहताना अमेरिकन श्रोते फिदीफिदी हसत होते, पण पु.ल. मनातल्या मनात दु:खी कष्टी झाले होते.

त्यांनी सांगितलेली दुसरी आठवणही भारतीयांना लाजेने मान खाली घालायला लावील अशा प्रकारची आहे. एकदा एका निग्रो बूटपॉलीशवाल्याने त्यांना विचारले "तुमचे नेते इतिहास वाचीत नाहीत का हो? एकदा तुम्हाला मुसलमानांनी लुबाडले मग इंग्रजांनी लुबाडले – आता चिन्यांकडून लुबाडून घेण्यासाठी उभे राहिला आहात? यू हॅव नो राइट टू बी इंडिपेंडंट! तुम्हाला स्वातंत्र्याचा अधिकारच नाही!"

पॉलिशप्रमाणे पॉलिटिक्सवरही अधिकारवाणीने बोलणाऱ्या त्या इसमाच्या बौद्धिक पातळीचे कौतुक करावे की आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचा फुगा फोडणाऱ्या त्याच्या धाष्टर्याबद्दल राम मानावा हे पु.लं.ना कळेना!

पराया मुलखातही स्वत:चा विसर न पडू देणारी पु.लं.ची ही वृत्ति पाहिली म्हणजे सावरकरांच्या अस्मितेची आठवण होते. उच्च शिक्षणाच्या निमित्ताने सावरकरांच्या बरोबर विलायतेला गेलेले विद्यार्थी तिथल्या विलासी वातावरणाने प्रभवित होऊन नाइट क्लबात आंग्ल युवती बरोबर नृत्याचे पाठ घेत होते, त्यावेळी स्वातंत्र्यवीराच्या हृदयांत क्रांतीकारी विचारांनी रूद्रभीषण तांडव घातले होते. भारतीय अस्मितेची सदैव जाणीव ठेवणारी पु.लं.ची ही अखंड सावधानताही यापेक्षा वेगळया जातीची आहे काय? 'अखंड' हे विशेषण बुद्ध यांचे योजले आहे. अमेरिकेला येण्यापूर्वी पु.लं. नी असाच दोन वेळा दूर देशचा प्रवास केला होता. तेव्हा सुद्धा ते आपल्या देशाला, संस्कृतीला विसरले नव्हते. स्वदेश, स्वधर्म, स्वसंस्कृती याविषयी पु.लं.ना वाटणारी आत्मीयता परदेशात गेल्यावरही कशी अभंग राहते हे त्यांच्या प्रवासवर्णनपर ग्रंथात पहावयास मिळते.

साहित्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोनही आता गुलदस्तांत राहिला नाही. संत

वाड्.मयापुढे ते ज्या लीनतेने माथा लववितात, हरिभाऊ आपटे, अण्णासाहेब किर्लोस्कर, देऊल, कोल्टकर, गडकरी, शि.म.परांजपे, खाडिलकर यांच्या साहित्याविषयी ते ज्या आदराने बोलतात त्याच आस्थेने अन् आपुलकीने ते अलीकडच्या कविलेखकांच्या गुणांचीही कदर करतात. नवसाहित्यांतल्या घातुक प्रवृत्तींचा निःसंदिग्धपणे उपहास करताना ते जशी कुणाची भीडमुर्वत ठेवीत नाहीत, तशी त्यांतील गुणांची प्रशंसा करताना हातचे काही राखूनही ठेवीत नाहीत। गंगाधार गाडगीळ, अरविंद गोखले, मंगेश पाडगांवकर, इंदिरा संत या साऱ्या नव्या तडफेच्या साहित्यिकांची साच्यातून बाहेर पडण्याची धडपड, परंपरेच्या पिंजऱ्याबाहेर पडून दिगंताचा वेध घेण्याची जिद्द त्यांना कौतुकास्पद वाटते. रूळलेली चाकोरी सोडून देऊन नव्या वाटा धुंडाळण्याच्या कैफात ही तरूण मंडळी कधी कधी खड्डयात उडी घेण्याचे बालीश साहस करू पाहते तेव्हा मात्र ते उद्विग्न होतात, अस्वस्थ होतात. त्यातच माधव गडकऱ्यांसारखा एखादा साहित्यिक जुन्या मुल्यांची, निष्ठांची खातिरदारी करताना आढळात आला म्हणजे कौतुकाने ते त्याची पाठ थोपटतात, त्याच्या लेखनाची तोंड भरून स्तुती करतात. 'असा हा महाराष्ट्र'या गडकऱ्यांच्या पुस्तकाला (भाग दुसरा) दिलेल्या प्रस्तावनेत ते म्हणतात-(१)

"...अति नवसाहित्यांत आपल्या या अगदी संपूर्ण देशी लिखाणाला मान्यता मिळेल की नाही,या भितीने ते कुठे गांगरलेले दिसत नाहीत. आदराने नम्र होणे, गहिवरणे, व्याकुळ होणे या भावना आधुनिक जीवनात संभवतच नाहीत असे मानण्याची एक नवी टूम आमच्या साहित्य प्रांती रूढ होऊ पाहात आहे. थोरांच्या पायाची धूळ कपाळाला लावण्याला महत्व नसून ते पाय मातीचेच होते हे अट्टाहासाने सिद्ध करण्याला वस्तुनिष्ठ बौद्धिकता मानली जात आहे. मी समाजाचे काहीही देणे लागत नाही अशी ही अत्यंतिक व्यक्तिवादी.... साध्या भाषेत स्वार्थी अशी ही भूमिका आहे. त्या पंथातल्या मंडळींना गडकऱ्यांच्या पुस्तकातला महाराष्ट्र जुना वाटेल. कदाचित् निरूपयोगीही वाटेल. परंतु सुदैवाने समाजात कृतघ्नांची संख्या कृतज्ञांहून कमी आहे. समाज थोरांचे उपकार स्मरतो. त्यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या गावांना क्षेत्र म्हणतो. त्यांचा पार्थीव देह जिथे भुईतल्या कुशीत निरवला आहे त्या जागेला समाधी म्हणतो..."

ही कृतज्ञता माधव गडकऱ्यांच्या ठिकाणी असल्यामुळे त्यांनी महाराष्ट्रातल्या पुण्यक्षेत्रांचे, पराक्रमी पुरूषांचे, नेत्यांचे, संतांचे नि कवींचे पुण्यस्मरण करावे हे स्वाभाविक आहे असे पु.लं.ना

वाटते आणि याबद्दल गडकऱ्यांना धन्यवाद देताना ते म्हणतात --(10)

"... हे ज्याला स्मरते त्याने का म्हणून 'मी एक जंतू, तू एक जंतू'चे तत्वज्ञान स्वीकारावे? कशासाठी म्हणून अभद्राची आराधना करावी? म्हणजे ज्ञानदेवाच्या समाधी पासून ते वासुदेव बळवंताने केलेल्या स्वतःच्या देहाच्या समिधेपर्यंतचे बलिदाने व्यर्थ म्हणायची की काय?"

अलीकडल्या नवसाहित्यांत दिसून येणाऱ्या तुच्छतावादाची पु.लं.नी याच विवेचनाच्या ओघात केलेली मीमांसाही ध्यानात ठेवण्यासारखी आहे. ते लिहितात,-(11)

"आदर्शाची हेटाळणी हा एक नवा चाळा चालू होऊ पाहतो आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातली समाजाचे सर्वांगाने भले व्हावे म्हणून चाललेली धडपड ज्यांनी अनुभवली नाही, त्यांच्या हातून असले लेखन होणे साहजिक आहे." पण हे साहजिक असले तरी संयुक्तिक नाही हे ही त्याही बरोबरच ते स्पष्टपणे सांगून टाकतात. इतिहासाला डावलून सामाजिक घटनांचा विचार करणे अशास्त्रीय आहे असे त्यांना वाटते म्हणून ते पुढे म्हणतात, -(11)

"साहित्य-कला हा सामाजिक घटनांचा एक भाग आहे. समाजाच्या अनेकांगी विकासाची लहान मोठी स्वप्ने डोळयापुढे ठेवून त्या स्वप्नांना सत्यात आणण्यासाठी आपले आयुष्य त्या कार्यात झोकून देणारी माणसे त्या काळात चोहोबाजूंना दिसत होती. आदर्श, ध्येय या शब्दांवर साहित्यिकांचा आणि समाजाचा विश्वास होता. कारण त्या शब्दामागे या ध्येयवादी लोकांची फौज उभी होती ती फौज कमी होत गेली म्हणून 'शब्द बापुडे केवळ वारा' झाले...."

साहित्याकडे पाहण्याचा पु.लं.चा दृष्टीकोण कसा स्वच्छ आहे, उदात्त आहे हे वाचकांच्या लक्षात यावे म्हणून त्यांच्याच शब्दात या संबंधीचे विवेचन उद्धृत केले आहे. घोरत पडलेल्या समाजाला धक्के देऊन जागे करण्याची फार मोठी शक्ती लेखकाच्या लेखणीत आहे असा त्यांना विश्वास वाटतो. इतकेच नव्हे तर सभोवतालच्या परिस्थितीकडे डोळेझांक करून आपल्याच तंद्रीत साहित्य निर्माण करीत राहणे ही घोर आत्मवंचना आहे असे त्यांचे मत आहे. डॉ. अवसऱ्यांच्या पुस्तकाला प्रास्ताविक लिहिताना ते म्हणतात --(12)

"साहित्य हे राजकारणच काय कशापांसूनच अलिप्त राहू शकत नाही. कशाच्याही सहित ते जाते म्हणून साहित्य राजकारण याचा अर्थ सत्तेच्या सिंहासनालाही विचकलेली किंवा वाजविलेली

बत्तीशी नव्हे. कारण केवळ सत्तेसाठी केलेली पक्षनिष्ठ चढाओढ एवढाच राजकारणाचा त्रोटक अर्थ नाही. सत्याचा शोध घेणे हेही सौंदर्याचा शोध घेण्याइतकेच साहित्याच्या कक्षेत बसते. आज नेत्यांनी जाणून किंवा अडाणीपणाने केलेल्या चुकांची फळे भोगायची पाळी आली असताना त्या चुकांची जाणीव करून देणे स्वतःला ती आधी करून घेणे, इतरांना शहाणे करणे हे विचारवंत म्हणविणाऱ्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. साहित्यिकाचे तर ते धर्मकर्तव्य आहे. सगळयांनी सुखाने जगावे ह्या हेतूने भारताने उदार मनोवृत्तीचा जर विपरीत अर्थ लावला जात असेल तर त्या मल्लीनाथाची वेळीच पायमल्ली करणे आवश्यक आहे...."

लेखणीचे हे सामर्थ्य ज्या साहित्यिकांना ओळखता आले त्यांच्याबद्दल मग ते नवसात्यिाचे निर्माते असोत वा जुन्या साहित्याचे – पु.लं.ना कमालीचा आदर वाटतो.

संगीत आणि नाटय यांच्याकडे पाहण्याचा पु.लं.चा दृष्टीकोनही असाच समतोल, उदार नि तर्कसंगत आहे हे त्यांच्याच विवेचनाच्या आधाराने स्पष्ट करता येईल. सौ. हिराबाई बडोदेकर, बालगंधर्व इत्यादी कलावंतांच्या सत्कार समारंभाच्या वेळी त्यांनी केलेल्या भाषणांतून त्यांची संगीत विषयक मते कशी विधायक स्वरूपाची अन् निकोप आहेत याचा श्रोत्यांना पडताळा आलाच आहे. संगीत विषयासंबंधी अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या दोन पुस्तकांना त्यांनी ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत त्यात त्यांचा हा दृष्टीकोण अधिक स्पष्ट झाला आहे. ह्या प्रास्ताविकांवरून पु.लं.ची संगीत विषयक जाणकारी किती सुक्ष्म नि मार्मिक आहे याची तर कल्पना येतेच, शिवाय संगीताचे अध्ययन करू इच्छिणाऱ्या नव्या पिढीतल्या उपासकांना त्यातील विचार दीपस्तंभासारखे सदैव मार्गदर्शन करू शकतील असाही भरवसा वाटू लागतो. 'संगीतातील घराणी' आणि 'संगीताचे रसग्रहाण' हे ते दोन ग्रंथ होत. दोन्ही ग्रंथाचे लेखक वेगवेगळे तसे त्यात त्यांनी चर्चिलेल्या प्रश्नाचे मूलभूत स्वरूपही परस्पराहून भिन्न. पण पु.लं.नी दोन्ही ग्रंथातल्या विषयांचा सारख्याच तादात्म्याने अन् कुशाग्र बुद्धीने परामर्श घेतल्याचे दिसून येते.

स्वरसौंदर्याचा खऱ्याखुऱ्या अर्थाने आस्वाद घ्यायचा असेल, संगीतविषयक अभिरूची डोळस व्हावयाची असेल तर गायकाप्रमाणेच श्रोत्यांनीही त्या बाबतीत थोडेफार सायास करणे कसे आवश्यक

आहे. राग, ताल, लय, स्वर विस्ताराचा मार्ग आक्रमीत जाण्याच्या गायकांच्या विविध तऱ्हा यांच्यासारख्या गोष्टीकडे बारकाईने लक्ष देऊन त्यांनी गाणे ऐकण्याचा सराव कसा ठेवावयास हवा हे पु.लं.नी ''संगीताचे रसग्रहण'' पुस्तकाच्या प्रस्तावनेत स्पष्ट करून सांगितले आहे. तर ''संगीतातील घराणी'' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत ग्रंथातील मूळ विषयाच्या अनुषंगाने उपस्थित होणाऱ्या विविध प्रश्नांचा अतिशय बारकाईने विचार केला आहे.

संगीतातल्या निरनिराळया घराण्यांची वैशिष्टये, शिष्यांच्या हेकटपणामुळे त्यांच्या घराण्यांना आलेली अवकळा, परंपरेचे जतन करण्यामागे दिसून येणारी पूर्वसूरींची तळमळ, जिद्द नि निष्ठा, ज्ञान लपविण्याच्या प्रवृत्तीमुळे संगीताच्या प्रसाराला पडलेल्या मर्यादा इत्यादी गोष्टींवर फार जिव्हाळयाने त्यांनी आपले विचार मांडले आहेत. नाट्यसंगीताला अभिजात संगीताचा दर्जा मिळवून देणारे भारदस्त गायक पुढे पुढे नाटकांतून त्याचे भलतेच प्रस्थ वाढविल्यामुळे त्यांच्याबरोबर नाटयकलेचाहि होत गेलेला अपकर्ष वगैरे कितीतरी मुद्यांना पु.लं.नी स्पर्श केला आहे.

गायकीच्या निरनिराळया परंपरांची उपासना करणाऱ्या गायकांच्या कष्टाचे, त्यांच्या निष्ठेचे नि संगीतापायी सर्वसंगपरित्याग करणाऱ्या 'अवलीया' वृत्तीचे ते ज्या आदराने कौतुक करतात तितक्याच निर्भीडपणे त्याच्यातल्या दोषांचाही निर्देश करतात. परंपरेचे सातत्य नि वैशिष्टय टिकविण्यासाठी त्या त्या घराण्याच्या अभिमान्यांनी ज्या काटेकोरपणे दुसऱ्या घराण्याच्या चिजेला तोंड लावण्याचा मोह टाळला, परान्न भक्षणाइतकीच दुसऱ्याच्या घराण्यांतल्या चिजेचे ग्रहण करण्याची बाब निषिद्ध मानली. आर्थिक किंवा कलात्मक हानि झाली तरी चालेल पण मी तडजोड स्वीकारणार नाही या जिद्दीने अन् कटाक्षाने त्यांनी आपल्या परंपरेचा जो अभिमान बाळगला तो पु.लं.ना आदणीय वाटतो. या व्रतस्थ पणामुळेच हे सारे कलावंत आपापल्या घराण्याची विशेषता वर्षानुवर्ष अबाधित राखू शकले असा त्यांना विश्वास वाटतो. याच जिद्दीमुळे शेकडो वर्षापूर्वी बांधलेल्या चिजा आजतागायत मूळ स्वरूपात कायम राहू शकल्या असे त्यांचे ठाम मत आहे. कलावंतांची जमेकडील ही बाजू निदर्शनास आणून देताना पु.लं.ना जसा अभिमान वाटतो तसा त्यांच्यातल्या उणीवेचा विचार करताना विषादही वाटतो. जुन्याचे जतन करण्याच्या भरात ह्या गायकांनी आंधळया पठण पद्धतीच्या आहारी जाऊन विचारांचे इंद्रियच बंद करून टाकले, नवीनाचा अजिबात स्वीकार करायचा नाही या कोत्या वृत्तीमुळे संगीत कलेच्या

विकासाला पायबंद बसला हे कटु सत्य बोलून दाखविताना त्यांनी गांधारीचा समर्पक दृष्टांत दिला आहे. ते म्हणतात "नवीनाचा स्वीकार डोळे झाकुन करू नये हे खरे ,परंतु एखादे वेळी नवीन काही तरी दृष्टीला पडेल या भीतीने सदैव डोळे झाकून हिंडणे हे काही पौरूषाचे लक्षण नव्हे. धृतराष्ट्र आंधळा म्हणून गांधारीने डोळयाला पट्टी बांधुन खुशीचे अंधत्व स्वीकारले हे पतिव्रता म्हणून कदाचित ठीक असेल पण तिला आपल्या दुष्ट मार्गाने जाणाऱ्या पोरांवर आई म्हणून डोळा ठेवता आला नाही. ती पत्नी धर्माला आंधळेपणाने जागली आणि मातृधर्माला विसरली आणि दुष्ट प्रवृत्तींना वेळीच आळा बसला नाही. संगीतांतही असला खुशीचा आंधळेपणा वाढीस लागला आणि कला खुरटली."

संगीताची आराधना करू इच्छिणाऱ्यांना पु.लं.नी याच प्रस्तावनेत दिलेला इशाराही बहुमोलाचा आहे. संगीतोपासना म्हणजे सतीचे वाण हे ज्याला पटेल त्याच्यांच हातून संगीताची सेवा घडू शकेल असा आपला अभिप्राय व्यक्त केल्यावर भारदस्त संगीताच्या अवनीतीची जी थोडक्यात मीमांसा केली तीही विचारात घेण्यासारखी आहे. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा :

अभिजात कलेला – मग ती नाटय, शिल्प, नृत्य, संगीत कोणतीही असो घाई अजिबात मानवत नाही आणि घाई हा मुळी आजचा युगधर्म होऊन बसला आहे. यामुळेच कलेच्या झटपट रंगारी शाळा निघाल्या आहेत. असल्या विद्यालयांतून भास्करबुवा, वझेबुवा, विष्णु दिगंबर कसे बाहेर पडणार? भारदस्त गायकी साध्य करावयाची असेल तर मनाचा चंचलपणा जाऊन ते स्थिर व्हायला हवे. सोळा मात्राच्या ठाय त्रितालाला तोंड द्यायला मनाचा संथपणा लागतो. मन चंचल असल्यावर सूर चंचल असायचेच. आजच्या बहुतेक गायक गायिकांना सुरावर स्थिरावणे नको असते याला कारण म्हणजे त्यांना लागलेली दाद मिळवण्याची घाई! दादरे, केरवे गर्दी चटकन् पकडतात तिलवडयाला धीर लागतो.... पु.लं.चे हे म्हणणे वस्तुस्थिती सोडून आहे असे कोण म्हणेल? ढंगदार अस्ताईची आलापी घेण्यात गायकाचा कसा कस लागतो यासंबंधी त्यांनी केलेले वर्णन त्यांच्याच शब्दात वाचणे योग्य होईल ते म्हणतात –(13)

"समेकडून समेकडे येताना तालाचे खाते डौलदार सुरांनी भरून काढता काढता गाणाऱ्याचा आणि ऐकणाराचा अंत लागतो. चांचल्य हे सहज तर स्थैर्य प्रयत्नसाध्य! झटक्यात टाळी मिळते म्हणुन तर फिरकीची गळेपडू तान रंगभूमीवर आली- आणि अनपढांची गर्दी खुश होते म्हणून तबला सतारीची

जुगलबंदी नायक हुल्लडबाजी सुरू झाली."

संगीताची आज अशी दुरावस्था सुरू झाली असली तरी त्यामुळे निराश होऊन सुस्कारे सोडीत बसण्याइतके त्यांचे मन दुबळे नाही. उलट नव्या पिढीतल्या कलावंतांना स्वत:वरल्या जबाबदारीची जाणीव करून देऊन ते त्यांना प्राप्त परिस्थितीतून कसा मार्ग काढावयाचा यासंबंधी चार समजुतीचे शब्द सांगतात, त्यांना धीर देतात. नव्या पिढीवर परंपरा जोपासण्याची जितकी जबाबदारी आहे तितकीच नव्या निर्मिती बाबतचीही आहे असे ते आवर्जून सांगतात. चित्रपटाच्या या जमान्यात नव्या थिल्लर संगीताने अभिजात संगीतावर कितीही आक्रमाण केले असले तरी त्यामुळे उमेद खचू न देता शास्त्रोक्त संगीताची नेटाने जोपासना चालू ठेवल्यास आज ना उद्या चित्रपट संगीतवालेही आपला पवित्रा बदलतील असा त्यांना विश्वास वाटतो. अभिजात संगीताची उपासना करू इच्छिणारांना नवे वा जुने कोणते तरी कुलधर्म पाळणे आवश्यक आहे हा पुन्हा पुन्हा त्यांनी दिलेला इशारा सर्वात महत्वाचा आहे. भूतकाळात बुजुर्गांनी संगीतासाठी जसे कष्ट घेतले तसे याहिपुढे घेतले जातील तर घराण्यांची निर्मिती संपल्याचा आक्रोश करण्याचे कारण उरणार नाही हा संदेश तर संगीताची वाटचाल करू इच्छिणाऱ्या प्रत्येक पाईकाने आपल्या अंत:करणावर कोरून ठेवावा इतक्या तोलामोलाचा आहे.

संगीताइतकाच नाटयाच्या क्षेत्रातही पु.लं.चा अधिकार फार मोठा आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. नट, नाटककार आणि नाटय समीक्षक या तिन्ही नात्यांनी आजवर त्यांनी केलेली कामगिरी अभूतपूर्व अशीच आहे. नटाविषयी वा नाटकाविषयी ते ज्या ज्या वेळी काही लिहितात, सांगतात त्या त्या वेळी त्यांच्या लिहिण्या बोलण्याला आधी केल्याचा भक्कम आधार असल्याची रसिकांना स्पष्ट जाणीव होत असते, ते केवळ मोले घातलेले नाही याची त्यांना पूर्ण खात्री वाटत असते.

नटांच्या सत्कार समारंभाच्यावेळी किंवा नव्या नाटय प्रयोगाच्या उद्‌घाटनाच्या प्रसंगी त्यांनी थोडक्यात पण मार्मिक नि उपयुक्त भाषण करून त्या विषयावरल्या आपल्या अधिकाराची आजवरनुसती चुणूक दाखविली होती. पण नांदेड इथे भरलेल्या नाटयसंमेलनाच्या अध्यक्ष पदावरून त्यांनी या विषयाची जी सविस्तर चर्चा केली त्यावरून साहित्य अन् संगीतकले इतकाच या विषयाचाहि त्यांनी फार जिव्हाळयाने, सुक्ष्मपणाने अभ्यास केला असल्याची जाणीव झाल्यावाचून राहत नाही.

पु.लं.नी आपल्या या भाषणात नाटयक्षेत्राशी निगडीत असलेल्या किती तरी प्रश्नांचा ऊहापोह केला आहे. किती तरी गोष्टीवर लख्ख प्रकाश टाकला आहे.

मराठी रंगभूमीला अललडुर्दच्या धांगडधिंग्यातून सोडवून तिच्या संसारात नीटनेटकापणा आणणाऱ्या अण्णासाहेब किर्लोस्करांपासून तो नेपथ्य, संविधानक स्वभावरेखन इत्यादी सर्वच बाबतीत आमूलाग्र क्रांती घडवून आणण्याची जिद्द बाळगणाऱ्या आजच्या नवोदित नाटककारापर्यंत ती कोणकोणत्या स्थित्यंतरातून गेली याचा धावता आढावा घेताना पु.लं. नी विधायक विचार मांडले तशा काही उद्‌बोधक सूचनाही केल्या. जुन्याची तरफदारी करताना त्यातील वैगुण्यांचाही निर्देश केला. नव्यातल्या दोषांची जाणीव करून दिली तसा त्यातला चांगला भागही दाखवून दिला. रंगभूमीच्या पिछेहाटीची त्यांनी केलेली मीमांसा नाटयव्यवसायातल्या कलावंतांना जशी मार्गदर्शक ठरेल तशीच रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीने त्यांनी प्रकट केलेले विचारही त्यांना माननीय वाटतील. पु.लं.च्या भाषणात येऊन गेलेल्या मुख्य मुख्य मुद्दयांचा नुसता उल्लेख करीन म्हटले तरी विवेचनाची मर्यादा अपेक्षेबाहेर जाईल. तथापि काहीचा त्रोटक निर्देश करणे आवश्यक वाटते.

इतर क्षेत्राप्रमाणेच नाटय क्षेत्रातही उत्पन्न झालेल्या परंपरा, नित्यशः निर्माण होत असलेल्या नव्या नव्या संस्कारांपासून अन् उलथापालथी पासून इतर कलांप्रमाणे नाटकालाही न राखता येणारी अलिप्तता. नाटक ही जीवनसंघर्षापासून दूर नेणारी पळवाट नसून त्या संघर्षाला तोंड देण्याची ताकद निर्माण करणारा एक समर्थ कला प्रकार आहे. हे ज्यांना ओळखता आले अशांनाच थोर नाटककार म्हणून मिळणारा सन्मान, आपली भूमिका स्वच्छ राहण्यासाठी कला निर्मिती मागली प्रेरणा आणि प्रयोजन स्पष्ट असण्याची आवश्यकता, वाढत्या औद्योगिक प्रगतीचा नाटय व्यवसायावर घडून येणारा सुपरिणाम, भोवतालच्या परिस्थितीनुसार विचारात व अभिरूचीत होणारा बदल... अशा कितीतरी गोष्टींची अतिशय मनमोकळेपणाने पु.लं.नी चर्चा केली आहे.

बंडखोरीतून नव्या नव्या परंपरा उदयाला येत असतात. आजची परंपरा कालच्या बंडखोरांनी सुरू केलेली असते आणि आजचे बंडखोर उद्याच्या परंपरेचा पाया घालतात या जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अनुभवाला येणाऱ्या नियमाला नाटयाचे क्षेत्रही अपवाद असू शकत नाही हे पु.लं.चे विधान केवळ भूतकाळावर नजर खिळवून बसलेल्या जुन्या अभिमान्यांनी जरूर विचारात घेण्यासारखे आहे.

त्याचप्रमाणे सुधारणेच्या कैफात आचरटपणालाच आधुनिकता म्हणून संबोधणाऱ्या तथाकथित क्रांतिकारकांना त्यांनी दिलेल्या कानपिचक्याही रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीने उपयुक्त नि उपकारक ठरतील अशाच विधायक स्वरूपाच्या आहेत यात शंका नाही। या मुद्याचे स्पष्टीकरण करताना त्यांनी एक मजेदार उदाहरण दिले आहे ते म्हणतात, "आधुनिकता ही अंतरंगांतली हवी. गणपतीच्या मूर्तीला बुशकोट चढवायचा ही आधुनिकता नव्हे. हा आचरटपणा झाला. पण त्याच गणेशाच्या धार्मिक अधिष्ठानाचा साम्राज्यशाहीला विरोध करणारे ज्वलंत विचार मांडायला उपयोग करून घेणे हे टिळकांनी गणेशपुजनाच्या परंपरेला दिलेले नवे वळण होते."

प्रगती आणि केवळ निराळेपणाची हौस यातील फरक सुधारणावाद्यांना कळला पाहिजे. प्रगती आणि फॅशन यांचा तोंडावळा सारखाच असला तरी दोहोतले मूलभूत अंतर सुज्ञांना ओळखता आले पाहिजे हे याच संदर्भात पु.लं.नी प्रकट केलेले विचार मननीय नाहीत असे कोण म्हणेल?

नाटक आणि संगीत यांच्या अन्योन्य संबंधाविषयी त्यांनी व्यक्तविलेला अभिप्रायही उद्‌बोधक आहे. संगीतामुळे मराठी नाटकांना उतरती कळा लागली. संगीत नाटकांमुळेच मराठी नाटकांना उतरती कळा लागली, संगीत नाटकामुळेच मराठी रंगभूमीच्या प्रगतीला पायबंद बसला असे आक्षेप कधी कधी कानावर येत असतात. यावर पु.लं.चा खुलासा असा की, मराठी नाटक हे संगीतामुळे ठार झाले नाही. संगीताच्या अतिरेकामुळे त्याचा 'ओव्हर डोज' झाल्यामुळे ते गुदमरल्यासारखे झाले होते इतकेच. संगीताने मराठी नाटक तारले, त्याला चिरसंजीवन मिळाले अशीच पु.लं.ची धारणा आहे. नाटकांतल्या नाट्याचे महत्त्व न ओळखता त्याला गौण स्थान देऊन संगीतावर भिस्त ठेवणारे अन् नाटकाला मैफलीची कळा आणणारे नाटककार व नट यांची जसजशी गर्दी होऊ लागली तसतशी रंगभूमीला विपन्नावस्था येऊ लागली. संगीत हा मराठी रंगभूमीला मिळालेला शाप आहे किंवा काय असा प्रश्न पडण्याइतकी तिची दुर्दशा झाली हे पु.लं.नी केलेले निदान शंभर टक्के बरोबर आहे. रंगभूमीचे यश घसरगुंडीला लागण्याची आणखी काही कारणे असतील पण संगीत नाटकापुरती पु.लं.नी केलेली ही मीमांसा चुकीची आहे असे म्हणता येईल काय? संगीताला ऐसपैस वाव मिळावा म्हणून नाटकांतल्या महत्त्वाच्या प्रवेशांनाही कातर लागू लागली. प्रेक्षकांकडून वन्समोअर उपटण्याचा नी टाळी मिळवण्याच्या मोहापायी नाट्य आणि संगीत याबाबतचे नटाचे तारतम्य सुटत चालले आणि गिरकीच्या तानेच्या

भेंडोळयामागून भेंडोळी गळयातून काढताना खुद्द गाणारे अन् ऐकणारे कासावीस होऊ लागले; आणि मग साहजिकच, धड मैफल नाही अन् नाटकही नाही असा पाच पाच सहा सहा तास चालणारा हा प्रकार पाहात बसण्यापेक्षा अडीच तीन तासात आटोपणारी, खऱ्याखुऱ्या अर्थाने नाटयाचे दर्शन घडविणारी आटोपशीर नाटके रंगभूमीवर यायला हवीत असे सुबुद्ध प्रेक्षकांना वाटू लागले त्यांत त्यांचे कुठे चुकले?

नाटकाच्या घातक ठरलेल्या संगीताच्या या अतिरेकाला अनुलक्षून पु.ल. मिश्कीलपणे म्हणतात, ''गाणाऱ्या नटांना किती वेळ गावे आणि नाटयसंगीत कसे गावे ह्याचे सोयरसुतक राहिले नव्हते. त्यामुळे लग्नाच्या मांडवात वधूवरापेक्षा सनईवाल्याचाच बोभाटा अधिक झाला... कलेला अनावश्यक असलेला बांधेसूदपणा सुटला, औचित्य सुटलं....'' या अविवेकामुळे नाटयसंगीतवाल्यांच्या पदरी जे अपयश आले त्याबद्दल पु.लं.नी अशाच मिष्किल शब्दात त्यांची संभावना केली आहे. ते म्हणतात, ''चांगलं नाटयसंगीत गेलं, नाटक गेलं आणि हाती नांदीपूर्वी घालायच्या धुपाचे धुपाटणं आले आता ह्यात संगीत नाटकाचा काय दोष?''

''नाटकात स्वगत असावीत की असू नयेत या संबंधीही आजवर पुष्कळच भवती न भवती झाली आहे. आधुनिक नाटय तंत्राचा बडीवार माजविणाऱ्यांनी स्वगतावर बहिष्कार टाकलेला दिसून येतो. पण स्वगतांचा कौशल्याने उपयोग केल्यास ते नाटयोत्कर्षास बाधक न ठरता साहाय्यकच ठरणार आहे असा पु.लं.नी पक्ष मांडला आहे. स्वतःशी केलेला एक मोकळा विचार म्हणजे स्वगत हे तत्व नटाने ध्यानात ठेवल्यास त्याचे स्वगत हे कृत्रिम न वाटता स्वाभाविकच वाटेल, उलट स्वतःच्या आवाजाची केवळ पल्लेदारी दाखविण्यासाठी तो स्वगताचा दुरूपयोग करू पाहील तर मात्र ते कृत्रिम ठरेल, अशा आशयाचा त्यांनी दिलेला अभिप्राय विशेष महत्वाचा आहे.

आणखी कितीतरी गोष्टींच्या बाबतीत त्यांनी धोक्याचा लाल कंदील दाखविला आहे, कितीतरी समस्यांची हळूवारपणे उकल करून दाखविली आहे. नाटयाशी निगडीत असलेल्या व्यावसायिकांच्या नि कलावंतांच्या पुढे उभ्या असलेल्या कितीतरी अडचणींचा सहानुभूतीने विचार केला आहे. सारांश पु.लं.चे हे अध्यक्षीय भाषण म्हणजे नाटयक्षेत्रात मुशाफरी करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना --

मग ते प्रेक्षक असोत, नट असोत, नाटककार असोत वा निर्माते असोत, एखाद्या दीपस्तंभा सारखे वाटल्याविना राहणार नाही।

नाटयकलेसंबंधी आस्था बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने पु.लं.चे हे सविस्तर भाषण समग्र वाचावे अशी आग्रहाची सूचना आहे. नाटयाविषयी पु.लं.चा दृष्टीकोण विशद केल्यानंतर त्यांच्याच भाषणातला आणखी एक लहानसा उतारा देऊन हा मुद्दा आटोपता घेते. नाटककारांनी अन् नटांनी नाटयकलेची आराधना करताना कोणकोणत्या गोष्टींकडे अवधान ठेवायला हवे यासंबंधी विवेचनकरताना ते म्हणतात, --(14)

"--सूचकता हे जरी साहित्याचे सौंदर्य वाढवणारे लक्षण असले तरी नाटय वाङ्.मयात मात्र दुर्बोधनेच्या प्रांतात शिरणारी सूचकता उपयोगाची नाही. नाटकाचा स्वभाव आतल्या गाठीचा असून चालत नाही. नाटकाचा स्वभाव फार मोकळा असावा लागतो. सूचकता केव्हाही सुंदरच पण ती दुर्बोधनेच्या बोळात शिरली की प्रेक्षकांची दिशाभूल होते. पण फार ठळकपणाही कृत्रिम वाटतो. संतांनी वेदांत सोपा केला, नाटककाराला मनुष्यस्वभावाची गहन कोडी सोपी करून मांडावी लागतात. चित्रे स्पष्ट हवीत पण बटबटीत नव्हे. साऱ्या नाटयमय घटना घडवून सहज घडल्यासारख्या दाखवायच्या, नटाने मोठयाने ओरडून गर्दीपुढे बोलायचे पण ओरडल्याचा भास न करता, प्रकाश योजना हवी पण ती कशी आणि केव्हा केली यावर प्रकाश न पाडता, पद हवीत पण ती गद्याची जवनिका दूर सारून संगीताच्या दालनात केव्हा शिरली हे न कळता, अभिनय हवा पण तो तद्रूपतेचा साक्षात्कार घडवीत, तद्रूपता हवी पण ती साऱ्या जाणिवाचा लगाम न सोडता, मानवी स्वभावाची द्वंद्वे हवीत पण स्वभावाच्या असंख्य छटांची इंद्रधनुष्ये दाखवावीत, लोकशिक्षणाला ना नाही, पण नाटयवस्तूत मिसळून आले तरच..."

यावरून नाटयाकडे पाहण्याचा पु.लं.चा दृष्टीकोण किती चोखंदळ, किती बारकाईचा आहे हे वाचकांच्या सहज लक्षात येईल.

कलेकडे वा जीवनाशी निगडीत असलेल्या कोणत्याही महत्वाच्या विषयाकडे पु.ल. कोणत्या दृष्टीकोनातून पाहतात या संबंधी आतापर्यंत थोडेबहुत विवेचन केले. यावरून एक गोष्ट सहजपणे आपल्या लक्षात येते ती ही की साहित्य, नाटय, संगीत, राजकारण या बाबतीत नवे जुने असा भेद

न करता चांगले कोणते, वाईट कोणते, विधायक कोणते, विध्वंसक कोणते याचाच त्यांनी प्रथम विचार केला. जे टिकाऊ असेल त्याचा स्वीकार करून टाकाऊ असेल ते रद्दीत काढून टाकले. बरे वाईट ठरविणारे पु.लं.जवळ कोणते निकष आहेत याची कल्पना नाही. बहुधा शास्त्री पंडितांना ठरविलेल्या पुस्तकी कसोटया त्यांच्याकडे नसाव्यातच. रत्नपारखी नुसत्या नजरेने हिऱ्याचे पाणी जोखतो, वसंताची चाहूल लागायला कोकिळेला पंचांगाचा आधार घ्यावा लागत नाही, भ्रमराला सुगंधाच्या चाऱ्याचा ठावठिकाणा दाखवून द्यायला वाटाडयाची आवश्यकता भासत नाही. पु.लं.नाही चांगल्या वाईटातले अंतर कळायला बाह्य साधनाची आवश्यकता वाटत नसावी. उपजत प्रेरणेच्या बळावर त्यांना ही निवड करता येत असली पाहिजे! अर्थात यासाठी अंत:प्रवृत्तीवर आधी खूपच संस्कार झालेले असले पाहिजेत यात शंका नाही.

उत्कृष्ट गायकी कोणती? ती काळजाचा ठाव घेईल ती! उत्कृष्ट काव्य कोणते? जे अंतर्यामात भावभावनांचा कल्लोळ उठविते ते! उत्कृष्ट नट कोणता? जो प्रेक्षकांना एकाच जागी चार चार तास खिळवून ठेवतो तो! सुंदर चित्र कोणते? टायटल न वाचताही ज्याचा अर्थ सहज आकलन होऊ शकतो ते! उत्कृष्ट भाषाशैली कोणती? जिच्यातला आशय शब्दांच्या शेवाळाने झाकळून गेलेला नसतो ती? खरी राजनिती कोणती? साम--दाम--दंड--भेद यापैकी ज्यावेळी जी उपयुक्त ठरेल, जिचा अवलंब करून राष्ट्राचे अस्तित्व अन् अस्मिता अबाधित राखता येईल ती!... अशा त्रिकालाबाधित कसोटया स्वत:पाशी बाळगणाऱ्या पु.लं.ना पंडिती कसोटयांचा आश्रय घेण्याची आवश्यकता तरी का वाटावी? सद्सद्विवेक बुद्धीचा निर्णय हा अंतिम निर्णय पु.ल. मानतात; म्हणूनच ते कोणत्याही गटाच्या, पक्षाच्या अगर संप्रदायाच्या आहारी जाण्याचे टाळू शकतात. त्यांची मते एककल्ली, एकांगी वाटत नाहीत ती त्यांच्या संतुलित, समतोल दृष्टीकोनामुळेच!

यामुळेच भिन्नभिन्न व्यवसायातल्या, भिन्न भिन्न आवडीच्या अनेक व्यक्तींशी ते जिव्हाळयाचे संबंध जोडू शकले, अनेकांचे प्रेम संपादन करू शकले. 'गणगोत' या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाची नुसती अनुक्रमणिका पाहिली तरी त्यांना 'लोकसंग्रह' केवढा अफाट आहे, किती वैचित्र्यपूर्ण आहे याची बरीचशी कल्पना येऊ शकते. पु.लं.ना लहानपणी पोस्टाची तिकिटे जमविण्याचा छंद होता की नाही कुणास ठाऊक, पण माणसे जमविण्याचा हा छंद त्यांनी बालपणापासूनच जडवून घेतला

असल्याच्या अनेक साक्षी, अनेक पुरावे आजमितीला उपलब्ध आहेत.

त्यांनी जिव्हाळा लावलेल्या नि लावून घेतलेल्या या आप्तविस्तारात मात्रा मोजणारे कवी आहेत, तसे मात्रा उगाळणारे वैद्यही आहेत, रसिकांकडून 'दाद' घेणारे कलावंत आहेत, तशी अंगी असलेल्या कलांची दाद न लागू देणारी मुडी माणसेही आहेत, ठेका धरणारे बजवय्ये आहेत तसे ठेका घेणारे कंत्राटदार आहेत, अध्यात्मावर ग्रंथ रचणारे वेदान्ती आहेत तसे फळीवर ग्रंथ रचून ठेवणारे पुस्तक विक्रेते आहेत, विश्व कल्याणाची चिंता वाहणारे प्रेषित आहेत तसे यमन कल्याणाच्या धुंदीत वावरणारे सूरलोभी आहेत,-सारांश, पु.लं. जवळ स्नेहाच्या धाग्याने बांधलेल्या अशा अनेक 'चिजांचा' फार मोठा भरणा आहे. या साऱ्या चिजात विविधता असली, वैचित्र्य असले तरी सर्वात हमखास आढळून येणारे एक मोठे साधर्म्य आहे ते म्हणजे त्यांच्यातली माणूसकी! त्यांच्यांतले सौहार्द!

पु.लं.ना सुरांइतकाच सुहृदांचा सहवास प्रिय आहे असे त्यांच्या संबंधाने कुणीतरी म्हटल्याचे स्मरते. शंभर टक्के खरे आहे त्यांचे ते म्हणणे!

असे आहे पु.लं.चे व्यक्तिमत्व! बहुरंगी, बहुढंगी!! मानवतेवर नि कलात्मतेवर सारख्याच उत्कटतेने प्रेम करणारे. एखाद्याच्या ठिकाणी माणूसकी असली अन् कलेचा अंशही नसला तरी पु.ल. पंढरीचे वारकरी चंद्रभागेच्या वाळवंटात उराउरी भेटतात तशी कडकडून त्याला मिठी मारतील.

मानवतेवरील या प्रगाढ प्रेमामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्वाला जसे मोल आले आहे तशीच त्यांच्या वाङ्मयालाही आगळी शोभा आली आहे.

लहानपणापासून प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याचे वारंवार प्रसंग येत गेले, पण उपजत विनोदबुद्धीमुळे त्या प्रसंगातला कडवटपणा त्यांना पचविता आला. निरीक्षणाने, व्यासंगाने त्यांच्या विनोदबुद्धीची धार तीक्ष्ण होत गेली आणि एखाद्या शस्त्रवैद्याच्या कौशल्याने ते समाजपुरूषाच्या विकृतीवर विनोद बुद्धीचे हत्यार चालवू लागले. इतका निर्मळ, इतका निरागस, प्रसन्न विनोद यापूर्वी महाराष्ट्राला कुणी दिला नाही.

पण पु.लं.ना याबद्दल गर्व नाही. उलट, कोल्हटकर, गडकरी, चिं.वि. जोशी, अत्रे यांच्या खांद्यावर उभे राहता आल्यामुळेच आपणाला आजूबाजूचे जग दिसू शकेल अशी त्यांची मनोमन श्रद्धा आहे.

लीनता हा आणखी एक दुर्मिळ गुण त्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने वास करीत आहे. मात्र हा विनय पुढाऱ्यांच्या विनयासारखा हंगामी नाही. निवडणूका संपल्या की नेत्यांची विनयशीलताही विराम पावते! तशी पु.लं.ची नम्रता उपरी वाटत नाही. त्यांनी राष्ट्रपतीकडून 'पद्मश्री' हा बहुमानाचा किताब मिळाला तेव्हा त्यांच्या ठिकठिकाणच्या चाहत्यांनी त्यांचा जाहीर सत्कार समारंभ आयोजित करण्याचे मनात आणले होते. पण पु.लं.नी त्या सर्वांना उद्देशून एक जाहीर निवेदनच प्रसिद्ध केले अन् त्यात असले समारंभ घडवून आणू नयेत म्हणून आग्रहाची विनंती केली ते निवेदन असे होते –

''भारत सरकारने मला पद्मश्री केले आणि त्यानंतर साहित्य अकादमीने माझ्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकास पारितोषिक दिले. ह्या प्रसंगी मला अनेक परिचित आणि अपरिचित हितचिंतकांची अभिनंदनपर पत्रे आणि तारा आल्या. पत्रकारांनीही वर्तमानपत्रातून जाहीरपणे आनंद व्यक्त केला. त्या सर्वांचा मी ऋणी आहे. त्यानंतर माझा जाहीर सत्कार करण्याबाबत बऱ्याच संस्थांनी इच्छा व्यक्त केली आहे. या संस्थांच्या भावनांबद्दल मला मनोमन आदर आहे. परंतु अशा प्रकारचा जाहीर सत्कार करून घेणे मला प्रशस्त वाटत नाही. माझ्याविषयीच्या सद्भावना पत्ररूपाने अथवा अन्य तऱ्हेने यापूर्वी अनेकांनी व्यक्त केलेल्याच आहेत. भारत सरकारने केलेला हा गौरव हा भारतीय जनतेने केलेला जाहीर सत्कार म्हणूनच मी अत्यंत कृतज्ञतापूर्वक स्वीकारला आहे. तरी माझ्या जाहीर समारंभाचे निराळे आयोजन कुठल्याही व्यक्तीने अगर सार्वजनिक संस्थेने करू नये अशी मी नम्रपणे प्रार्थना करतो. कृपया कोणीही गैरसमज करून घेऊ नये ही विनंती.

पु.लं.च्या नम्रतेचा असाच आणखी एकदा प्रत्यय जनतेला आला तो त्यांनी पाक आक्रमणाच्या वेळी ब्लड बँकेला भरघोस आर्थिक साहाय्य केले त्या प्रसंगाच्या निमित्ताने. एका जाहीर सभेत त्यांच्या या दातृत्वाबद्दल गौरव करताना त्यांना कुणीतरी दानशूर म्हणून संबोधले. तेव्हा उत्तरादाखल भाषण करताना ते म्हणाले, "हा कार्यक्रम मी एकटयाने केला आहे असे सांगितले जाते. पण माणूस एकटा कधीच नसतो. तो गर्दीतला एक असतो. या कार्याला अनेकांचा हातभार लागला आहे. या प्रसंगी 'दानशूर' वगैरे विशेषणे मला लावू नयेत. ते लावले की उगीचच मला पोट सुटलेल्या मारवाडयासारखे वाटायचे!''

पु.लं.च्या या उत्तरात मिष्किलपणाची झाक असली तरी त्यातच त्यांच्या नम्रपणाचाही

13523

A

आढळ होत नाही काय? मात्र हा नम्रपणा कुठेही वाकेल असा बिनकण्याचा नाही! वाकायचा तिथेच वाकतो. भारत पाक युद्धाच्या वेळी सरकारने शेवटी जे अवसानघातकी धोरण स्वीकारले त्याबद्दल त्यांनी अत्यंत कडक शब्दांत निषेध व्यक्त केला होता. बहुधा महाराष्ट्र टाईम्सच्या अंकात ते वक्तव्य प्रसिद्ध झाले असावे. पु.लं.सारख्या मेणाहून मऊ वाटणाऱ्या माणसात वज्राचाही विध्वंस करील असे काठिण्य विधात्याने कुठेतरी लपविलेले असते हे अश वेळी प्रत्ययाला येते.

आपणाला व्यवहारातले कळत नाही असे पु.ल. कधी कधी म्हणत असतात. पण याचा पडताळा सुनीताबाई त्यांच्या पत्नी कधी येऊच देत नाहीत. कारण सारा व्यवहार त्याच पाहत असतात. परटाला समज देण्यापासून तो पाटर्याला सूचना देण्यापर्यंतची सारी जबाबदारी सुनीताबाईंचीच! पु.लं.ना यातले काही कळत नाही म्हणून नव्हे तर त्यांना लेखन वाचनासाठी, नाटयप्रयोगासाठी, भाषणाच्या तयारीसाठी भरपूर स्वास्थ्य अन् वेळ मिळावा म्हणून! परवानगीवाचून नाटयप्रयोग करणाऱ्या हौशी मंडळींवर वॉरंट बजावण्यासारख्या गोष्टीपेक्षा गाणे बजावण्याकडे अन् बाजारभावातल्या चढ उतारापेक्षा स्वरांच्या आरोहावरोहाकडे आपल्या यजमानांनी लक्ष दिल्यानेच जगाचे भले होणार आहे अशी त्यांची प्रामाणिक श्रद्धा आहे. जुन्या जमान्यांतल्या मोठमोठया पुरूषांच्या सहधर्मचारीणींवर पान वाढण्या पलीकडे फारशी जबाबदारी येऊन पडत नसे. पण सुनीताबाईंची नेटका प्रपंच करून दाखविण्याची क्षमता इतकी उदंड की, कंपोजला गेलेल्या पतिराजांच्या पुस्तकाची पाने अपेक्षेबाहेर 'वाढल्यावर' त्या आपत्तीला कसे तोंड द्यायचे यावरही त्यांना उत्तम तोडगा काढता येतो! 'गृहिणी सचिवः सखी...' वगैरे कलमे तर त्या उत्तम प्रकारे सांभाळतातच शिवाय प्रुफ करेक्टर, टेलीफोन ऑपरेटर, अकाउन्टंट वगैरे भूमिकाही 'सचिवः सखी' वगैरेच्या जोडीला घरातल्या घरात पार पाडीत असतात. पु.लं.च्या अपॉइन्टमेंटस् ठरविणे, त्यांच्या नाटयप्रयोगाच्या मानधनाचा हिशेब ठेवणे, त्यांच्या हस्तलिखिताची सुवाच्य अक्षरात प्रत तयार करणे, आल्या गेल्याचे आदरातिथ्य ठेवणे... एवढा प्रचंड व्याप त्या कसा काय सांभाळू शकतात ते परमेश्वरालाच ठाऊक! अन् हे सारे भांडयांना पोचे न येऊ देता किंवा पदविन्यासांतल्या नेहमीच्या 'वजनांत' काही फरक पडू न देता!

ही संसारकृत्य सांभाळून 'गडकरी दर्शन', 'राजमाता जिजाबाई', 'वाऱ्यावरची वरात' या सारख्या मुक्त नाटयातून नीटसपणे भूमिका वठवून दाखविण्याइतका त्यांना कसा काय वेळ मिळतो हे

तर षण्मासींचा वायदा देऊनही न उलगडण्यासारखेच कोडे आहे. हे तो देणे ईश्वराचे, दुसरे काय? ब्रिटिशांच्या अमदानीत सुनीताबाईंनी राष्ट्रीय आंदोलनातही सक्रीय भाग घेऊन आपल्या व्यक्तित्वाचा आणखी एक उज्वल पैलू निदर्शनास आणून दिला होता हे किती जणांना ठाऊक आहे?

पत्नीप्रमाणेच पु.लं.च्या दोन्ही धाकट्या बंधुंना कलेची नितांत आवड आहे. रमाकांतांनी चित्रकलेत व अभिनयांत नैपुण्य मिळविले आहे. उमाकातांना अभिनय व दिग्दर्शन कलेत विशेष गोडी आहे. ह्या दोन्ही भावांनी पु.लं.च्या नाट्टकात व वाऱ्यावरच्या वरातीसारख्या मुक्त नाटयांत लहानमोठया भूमिका करून यशाचा वाटा उचलला आहे.

बाळपणी या तिन्ही सुपुत्रांवर केलेल्या सुसंस्कारातून अंकुरलेला कर्तृत्वाचा वृक्ष फळीफुली बहरतांना पाहून पु.लं.च्या मातु:श्रींना जे समाधान वाटत असेल, केल्या श्रमाचे चीज झाल्याच्या जाणिवेने जी प्रसन्नता वाटत असेल तिचे शब्दांनी कुठंवर वर्णन करावे? धावपळीच्या अनिश्चितपणाचा, उपार्जनासाठी उपसाव्या लागणाऱ्या कष्टांचा काळ संपून ते आता जीवनात स्थिरावल्याची सुचिन्ह दिसत आहेत. 'तुझे आहे तुजपाशी' मधील काकाजींच्या शब्दात सांगायचे झाल्यास त्यांना आता आपला खरा 'सूर'सापडला आहे. महेफिलीला इथून खरा मजा येणार असा रंग दिसू लागला आहे.

आतापर्यंत शाब्दिक 'विटांची' चाळ बांधीत आलेला हा कलावंत आता खऱ्याखुऱ्या विटांच्या स्वत:च्या मालकीच्या बंगल्यात राहण्यास गेला आहे. स्वकष्टार्जित कमाईतून थोडयाच अवधीत आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज अशी सुंदर, प्रशस्त वास्तु पु.लं.नी उभी करावी याचा त्यांच्या चाहत्यांना अभिमान वाटल्यावाचून राहणार नाही. पण या संदर्भात अति उच्च अति उदात्त पातळीवरून प्रवचन करणारे काही वेदांतीही निघालेच. "लेखकाला मान सन्मान, कीर्ति, प्रसिद्धी तसे काही वाईट नाही, पण त्याने घर बांधण्याइतका पैशाचा हव्यास बाळगावा! हे मात्र....'' वगैरेसारखी वाक्ये या संबंधात काढून बोधीवृक्षाखाली कामिनी कांचनविषयीचा साक्षात्कार झाला तो जणू आपणालाच अशी ऐट आणणारे काही महात्मे ठाऊक आहेत. लेखक म्हटला की, त्याच्या धोतराला गाठी असल्या तरी चालतील पण त्याने गाठीला पैसा बाळगता कामा नये अशा उपदेशाची तुळशीपत्रे बरोबर घेऊन फिरणाऱ्या असल्या मुनिसत्तमांना पु.लं.नी तरी काय उत्तर द्यावे?

लेखकाने आजन्म दारिद्रयाचा वसा घेऊन जीवन कंठावे, मिंधेपणाने, अंग चोरून,

खालच्या मानेने वावरल्याप्रमाणे जगात वावरावे हा संकेत त्यांना साफ नामंजूर आहे. बंगला, मोटर, नोकर, चाकर पदरी न बाळगायला लेखकाने कोणते पाप केलेले नसते. जीवनातल्या यच्चयावत सुखोपभोगावर त्याचाही इतरांइतकाच अधिकार आहे. भोग भोगण्यांत कसलेच पाप नाही. भोगांच्या आहारी जाण्यात पाप आहे असे त्यांचे रोखठोक तत्वज्ञान आहे. या तत्वज्ञानातच काय चूक आहे हे कळत नाही. पण या मुद्याचा इथे विशेष उहापोह करावयाचा नाही. पु.लं.च्या व्यक्तिमत्वाचा परिचय करून देणारे हे विवेचन आटोपत घेताना त्यांच्या असंख्य चाहत्यांच्या वतीने एवढेच म्हणेन पु.लं.ना खूपखूप ऐश्वर्य लाभो, संपत्ति लाभो आम्हाला त्याचा हेवा नाही. आमचा त्यांना एवढाच आग्रह असेल त्यांनी खूप लिहावे इये मराठीचिये नगरी हास्याचा सुकाळु करून सोडावा. आजपर्यंत मराठी रसिकांना दिला तसा अभिजात निर्मळ विनोद यापुढेही सतत देत जावा. आजपर्यंत निर्माण केल्या तशा सुरेख व्यक्तिरेखा यापुढेही रेखाटण्यांत कृष्णाकाठी कुंडल, गडकरी दर्शन व बटाटयाची चाळ, वाऱ्यावरची वरात, हसविण्याचा माझा धंदा यासारखे नित्य नवे नवे प्रयोग करीत राहावे आणि हे सारे करायला परमेश्वराने त्यांना उदंड आयुष्य द्यावे!

---------

## – संदर्भ टीपा –


1. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 2
2. 'ललित' मासिक.प्रा. मं.वि. राजाध्यक्ष —
3. 'गणगोत', पु. ल. देशपांडे, मौज प्रकाशन, (1998), आठवी आवृत्ती, पृ. 2
4. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मनोरंजन प्रकाशन, मुंबई, (1968), प्रथमावृत्ती, पृ.38
5. 'ललित मासिक', प्रा. मं.वि. राजाध्यक्ष (1965)
6. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मनोरंजन प्रकाशन, मुंबई, (1968), प्रथमावृत्ती, पृ. 40
7. 'माओचे लष्करी आव्हान', श्री दि.वि. गोखले, (1963)
8. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मनोरंजन प्रकाशन, मुंबई (1969), प्रथमावृत्ती, पृ.49
9. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मनोरंजन प्रकाशन, मुंबई, (1968), प्रथमावृत्ती, पृ.53
10. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मनोरंजन प्रकाशन, मुंबई, (1968), प्रथमावृत्ती पृ. 53
11. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मनोरंजन प्रकाशन, मुंबई(1968), प्रथमावृत्ती, पृ54
12. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मौज प्रकाशन, मुंबई, (1968), प्रथमावृत्ती, पृ. 54
13. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मनोरंजन प्रकाशन, मुंबई (1968), पृ. 58
14. 'असे हे पु.ल.', बाळ शंकर देशपांडे, मनोरंजन प्रकाशन, मुंबई (1968), प्रथमावृत्ती, पृ.62


--------